**"आवाहन"**

**महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षातील मराठी भाषेचे धोरण** ठरविणेसाठी डॉ.नागनाथ कोत्तपल्ले यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने नेमलेल्या भाषा सल्लागार समितीने मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर अशा एकूण ६ महसुली विभागामध्ये स्थानिक लेखक, प्राध्यापक / शिक्षक आणि मराठी भाषा तज्ञ इ. मान्यवरासोबत सहविचार बैठका घेतल्या असून याबाबत समितीने तयार केलेल्या मसुदा अहवालाची प्रत शासनाच्या खालील नमूद संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे –

१. **http://maharashtra.gov.in**

२. **http://intranet.maharashtra.gov.in**

३. **http://marathibhasha.maharashtra.gov.in**


यासंदर्भात मंत्रालयीन सर्व विभाग, शासकीय / निमशासकीय / खाजगी कार्यालये, संस्था, मंडळे / महामंडळे, विद्यापिठे, महाविद्यालये, विद्यालये तसेच साहित्यिक, मराठी भाषा तज्ञ व जनता इत्यादींकडून या धोरणावरील मसुदा अंतिम करण्यासाठी काही सूचना, सुधारणा, हरकती असल्यास यावरील अभिप्राय मागविण्याची तारीख १५ डिसेंबर, २०१४ अशी होती ती आता दि.२५ फेब्रुवारी, २०१५ अशी वाढविण्यात येत आहे. तरी यावरील आपल्या काही सूचना, सुधारणा, हरकती असल्यास खालील पत्त्यावर / ई-मेलवर दि.२५ फेब्रुवारी, २०१५ पर्यंत पाठविण्यात यावेत असे आवाहन मराठी भाषा विभागामार्फत करण्यात येत आहे.

पत्ता : उप सचिव,
मराठी भाषा विभाग,
नविन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक : ०२२ – २२८५२२९८
०२२ – २२७९४१६८

ई-मेल : marathibhasha.dhoran@gmail.com

म



# महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षांसाठीचे मराठी भाषाविषयक धोरण २०१४ (मसुदा)

भाषा सल्लागार समिती, महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र राज्याचे
# पुढील २५ वर्षांसाठीचे
# मराठी भाषाविषयक धोरण
# २०१४
# (मसुदा)

■

भाषा सल्लागार समिती

महाराष्ट्र राज्य

## भाषा सल्लागार समिती
## मसुदा उपसमिती

■

अध्यक्ष

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

सदस्य

डॉ. माधवी वैद्य

प्रा. हरी नरके

प्रा. विलास खोले

प्रा. दत्ता भगत

प्रा. विश्वनाथ शिंदे

## भाषा सल्लागार समिती
## सदस्य

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले (अध्यक्ष)
प्रा. दत्ता भगत (सदस्य)
श्री. सदानंद मोरे (सदस्य)
प्रा. हरी नरके (सदस्य)
प्रा. विश्वनाथ शिंदे (सदस्य)
प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर (सदस्य)
श्री. सतीश काळसेकर (सदस्य)
श्री. लक्ष्मण गायकवाड (सदस्य)
डॉ. संजय गव्हाणे (सदस्य)
प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी (सदस्य)
डॉ. रमेश वरखेडे (सदस्य)
प्रा. विलास खोले (सदस्य)
डॉ. माधवी वैद्य (सदस्य)
डॉ. प्रमोद गोविंदराव मुनघाटे (सदस्य)
डॉ. श्रीकांत तिडके (सदस्य)
श्री. दादा गोविंदराव गोरे (सदस्य)
श्री. अनिल श्रीपाद गोरे (सदस्य)
प्रा. भालचंद्र शिंदे (सदस्य)
प्रा. निरंजन घाटे (सदस्य)
डॉ. पंडित विद्यासागर (सदस्य)
श्री. लक्ष्मण लोंढे (सदस्य)
सचिव, मराठी भाषा विभाग (सदस्य)
सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग (सदस्य)

सचिव, शालेय शिक्षण विभाग (सदस्य)
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग (सदस्य)
संचालक, राज्य मराठी विकास संस्था (सदस्य)
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ (सदस्य)
सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ (सदस्य)
भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य (सदस्य-सचिव)

□

# मराठी भाषाविषयक धोरण

**२०१४**

**(मसुदा)**

---


**।१। प्रास्ताविक**

**।२ । मराठी भाषेची सद्य:स्थिती**

२.१ शिक्षण

२.२ न्यायव्यवस्था

२.३ प्रशासन

२.४ वित्त संस्था

२.५ उद्योगजगत

२.६ प्रसारमाध्यमे

२.७ बोली

२.८ प्रमाणीकरण

२.९ इतर व्यवहार

**।३। मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे**

**।४। मराठी भाषाविषयक धोरणासंबंधीच्या शिफारशी**

**४.१. शिफारशी**

४.१.१ शिक्षण

४.१.२ उच्च माध्यमिक शिक्षण

४.१.३ उच्च शिक्षण

४.१.४ न्यायालयातील कामकाजात मराठीचा वापर

४.१.५ प्रशासन

४.१.६ वित्त संस्था

४.१.७ उद्योगजगत

४.१.८ प्रसारमाध्यमे

४.१.९ नव तंत्रज्ञान आणि मराठीचा वापर

४.१.१० अन्य महत्त्वाच्या बाबी

**४.२. शिफारशींच्या अंमलबजावणीसाठीचा कालबद्ध कार्यक्रम**

**।५। धोरणाच्या अंमलबजावणीविषयीच्या शिफारशी**

५.१. पूर्वेतिहास

५.२. दंडसंहिता

**।६। फेर आढावा**

**।७। उपसंहार**

**।८। परिशिष्ट**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भासस-२०१०/ प्र.क्र.७४/२०-ब, दि. २२ जून २०१० रोजी काढलेल्या आदेशान्वये मराठी भाषाविषयक धोरणाचा मसुदा सादर करित आहोत.

डॉ. माधवी वैद्य

प्रा. दत्ता भगत

प्रा. हरी नरके

प्रा. विश्वनाथ शिंदे

प्रा. विलास खोले

डॉ. नागनाथ कोत्तापले
अध्यक्ष

# मराठी भाषाविषयक धोरण

## २०१४

## (मसुदा)

---

## अनुक्रमणिका


। एक ।

प्रास्ताविक । १०

। दोन ।

मराठी भाषेची सद्य:स्थिती । १३

। तीन ।

मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे । २५

। चार ।

मराठी भाषाविषयक धोरणासंबंधीच्या शिफारशी । २९

। पाच ।

धोरणाच्या अंमलबजावणीविषयीच्या शिफारशी । ५४

। सहा ।

फेर आढावा । ५८

। सात ।

उपसंहार । ६०

। आठ ।

परिशिष्ट । ६३

म

□

भाग एक

# । प्रास्ताविक ।

। प्रास्ताविक ।

मराठी ही देशातील जवळपास एकदशांश लोकांची मातृभाषा आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात व संस्कृतीत तिचे अजोड असे स्थान आहे. त्यामुळे तिच्या एकंदर व्यवहारासंबंधीचे धोरण ठरविताना अनेक घटकांचा विचार अपरिहार्य ठरतो. मराठी भाषेचा विचार हा केवळ माध्यमापुरता विचार नाही. तसा कोणत्याच भाषेचा विचार माध्यमापुरता सीमित राहू शकत नाही. भाषेचा विचार भाषेच्या इतिहासाइतका मागे जातो. भूतकाळाच्या प्रकाशातच वर्तमानकाळाला आणि भविष्यकाळाला अर्थ लाभत असतो. भाषेत जन्माला येणारे वाङ्मय भाषेच्या स्वरूपास विवक्षित रूप लाभण्यास साहाय्यकारी ठरत असते. वेगवेगळ्या काळातील राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती भाषेच्या जडणघडणीवर परिणाम करीत असते. उदा. तेराव्या शतकात महानुभाव संप्रदायाने 'महाराष्ट्री असावे' असा आग्रह धरला आणि संस्कृतऐवजी मराठीत ग्रंथरचना करण्याचे धोरण अवलंबिले. "तुमचा अस्मात्-कस्मात मी नेणें गा : मज श्रीचक्रधरें निरूपिली मऱ्हाटीं : तियांचि पुसा :" असा मराठी भाषेचा आग्रह भटोबासांनी धरला होता. यादव राजांच्या काळात मराठी वाङ्मयाची भरभराट झाली. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी "माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेहि पैजा जिंके । ऐसी अक्षरे रसिकें मेळविन ।।" अशी प्रतिज्ञा केली. मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावण्यापूर्वी तीनशे-साडेतीनशे वर्षे अगोदरच संत नामदेवांनी पंढरपूरचा पांडुरंग पंजाबात नेला आणि मिश्र मराठी भाषेत काव्यरचना केली. संत एकनाथांनी 'एकनाथी भागवता'त "हे टीका तरी मराठी । परि ज्ञानदाने होईल लाठी ।।" असा विश्वास व्यक्त केला. यानंतरच्या काळात छत्रपती शिवाजीराजांनी 'राज्यव्यवहारकोश' सिद्ध केला. असे आणखीही तपशील सांगता येतील. मुख्य मुद्दा असा, की भाषेला केवळ संज्ञापनाचेच अंग नसते, अस्मितेचेही बलवत्तर अंग असते आणि ते दुर्लक्षिण्याजोगे नसते.

मराठीची ओळख करून देताना ती कन्नड, गुजराती, तेलुगू, हिंदी या भाषांची शेजारभाषा आहे आणि बंगाली, आसामी, तमिळ या भाषाभगिनींशीही भाषांतरित साहित्यकृतींनी जोडलेली आहे हे विसरता येत नाही. इंग्रजांच्या आगमनानंतर तर उर्दू, फार्सी या भाषांपेक्षाही इंग्रजी भाषेचे अनेकविध

संस्कार तिच्यावर झाले आहेत. मराठी भाषेविषयीचे पुढील पंचवीस वर्षांचे धोरण निश्चित करताना या सगळ्या घटकांचा आपल्याला विसर पडून चालणार नाही.

महाराष्ट्र शासनाने दि. २२ जून २०१० रोजी शासन निर्णय क्रमांक भासस-२०१०/ प्र.क्र.७४/२०-ब, अन्वये भाषा सल्लागार समितीचे पुनर्गठन केले. हे पुनर्गठन करीत असताना या समितीच्या कामकाजासंबंधी शासन आदेश निर्गमित करण्यात आला. भाषा सल्लागार समितीने कोणकोणती कामे करावयाची आहेत, याचा निर्देश या शासन आदेशामध्ये करण्यात आला होता. त्यातील एक महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षांचे मराठी भाषेसंबंधीचे धोरण निश्चित करणे. या अनुषंगाने भाषा सल्लागार समितीच्या वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या बैठकांमध्ये विस्तृत चर्चा व विचारविनिमय करण्यात आला. त्यानुसार पुढील २५ वर्षांतील महाराष्ट्र शासनाचे भाषाविषयक धोरण काय असावे, ते ठरविताना यासंबंधी महाराष्ट्राच्या विविध भागांतील अभ्यासकांशी चर्चा करण्यात यावी व अभ्यासकांची आणि नागरिकांची मते जाणून घेण्यात यावी, असेही ठरविण्यात आले. त्या दृष्टीने सहा महसुली विभागांमध्ये सहविचार सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.

पहिली सहविचार सभा पुणे येथे दि. ८ एप्रिल २०१३ रोजी आयोजित करण्यात आली. त्यानंतर दि. १७ मे, २०१३, दि. २३ मे २०१३ आणि दि. २८ मे २०१३ या दिवशी अनुक्रमे नाशिक, औरंगाबाद व मुंबई येथे सहविचार सभा पार पडल्या. दि. ७ जून २०१३ रोजी अमरावती येथे व दि. ८ जून २०१३ रोजी नागपूर येथे सहविचार सभांचे आयोजन करण्यात आले. या आयोजनामध्ये महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे), मराठवाडा साहित्य परिषद (औरंगाबाद), विदर्भ साहित्य संघ (नागपूर), मुंबई मराठी साहित्य संघ (मुंबई), के. टी. एच. एम. महाविद्यालय (नाशिक) व शिवाजी शिक्षण संस्था (अमरावती) या संस्थांचे सहकार्य घेण्यात आले.

या सहा ठिकाणी झालेल्या सभांमधून महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतील मिळून जवळपास ३५० ते ४०० अभ्यासक, वाचक, कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिक यांनी आपली मते मांडली. ती समजावून घेण्यात आली. तसेच या सहविचार सभांचा अहवाल भाषा सल्लागार समितीच्या दि. २० व २१ जून २०१३ आणि दि. २० व २१ नोव्हेंबर २०१३ या दिवशी बैठकींत मांडला. सदरच्या बैठकीत भाषा सल्लागार समितीच्या सदस्यांनीही प्रस्तुत विषयासंबंधी आपापली मते व्यक्त केली. त्यातून मराठी भाषेसंबंधीचे सर्वसामान्य प्रश्न, विशिष्ट प्रश्न, मराठी भाषेची सद्यःस्थिती आणि भाषाविषयक समस्यांची सोडवणूक करण्यासंबंधीचे काही मार्ग सूचित झाले. सविस्तर चर्चाविनिमयातून मराठी भाषाविषयक धोरणाची जी दिशा सुस्पष्ट होत गेली, तिचा मागोवा घेत, धोरणासंबंधीचा मसुदा तयार करण्याचे ठरले.

■

# म

□

## भाग दोन

## । मराठी भाषेची सद्यःस्थिती ।

२.१ शिक्षण

२.२ न्यायव्यवस्था

२.३ प्रशासन

२.४ वित्त संस्था

२.५ उद्योगजगत

२.६ प्रसारमाध्यमे

२.७ बोली

२.८ प्रमाणीकरण

२.९ इतर व्यवहार

**। मराठी भाषेची सद्य:स्थिती ।**

भारताची प्रांतरचना भाषानिहाय करण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये (अनुच्छेद ३४४ (१) आणि ३५१ नुसार) राष्ट्रीय भाषा म्हणून २२ भाषांमध्ये मराठी ही तेराव्या क्रमांकावर आहे. राज्याच्या एकात्मतेचे आणि विकासाचे साधन या दृष्टीने भाषा हा महत्त्वाचा घटक होय ही दृष्टी या धोरणामागे आहे, असे त्यातून अधोरेखित झाले आहे. भारतातील इतर प्रांतांची निर्मिती जशी भाषावार झाली, तशी महाराष्ट्राची निर्मिती झाली नाही. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. अनेकांना हौतात्म्य पत्करावे लागले आणि प्रखर व यशस्वी आंदोलनानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६५, दि. ११ जानेवारी, १९६५ अन्वये महाराष्ट्राची राजभाषा म्हणून मराठी भाषेला मान्यता मिळाली आणि 'मराठी असे आमुची मायबोली । जरी आज ती राज्यभाषा नसे' ही कविवर्य माधव जूलियन यांची व्यथा दूर झाली. परंतु त्याचबरोबर 'हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू । हिला बैसवू वैभवाच्या शिरी' ही जबाबदारीही मराठी भाषकांवर आली. मराठी भाषा ही राजभाषा म्हणून निश्चित झाल्यानंतर स्वाभाविकपणे महाराष्ट्रातील सर्व व्यवहारांमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य ठरला. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात मराठी भाषा व संस्कृती यांच्यासंबंधीचे बहुविध उपक्रम सुरू केले, याची आवर्जून नोंद करावयास हवी. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी वेगवेगळे आदेश निर्गमित केले आहेत.

१९५२ ते १९५४ या कालावधीत पुणे विद्यापीठात 'भारतीय भाषा परिषद' आयोजित करण्यात आली होती आणि तीमध्ये प्रत्येक राज्याची भाषा पुरेशी सक्षम करण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी असे ठरले. काही धोरणेही निश्चित करण्यात आली. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर व राजभाषा म्हणून मराठी भाषेचा स्वीकार केल्यानंतर दि. ६ जुलै १९६० रोजी स्वतंत्र भाषा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर एप्रिल १९६१

मध्ये भाषा संचालनालयास मार्गदर्शन करण्यासाठी 'भाषा सल्लागार मंडळ' स्थापन करण्यात आले. भाषा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली भाषा संचालनालयाने मराठी भाषेच्या विकासासाठी विविध प्रकारचे उपक्रम सुरू केले. त्यांपैकी सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे राज्यकारभार, कार्यालयीन कामकाज व सर्वसामान्य जनव्यवहार सुलभपणे करता यावेत यासाठी तज्ज्ञ व्यक्तींच्या सहकार्याने वेगवेगळ्या विद्याशाखांतील परिभाषा कोशांची निर्मिती केली. भाषा सल्लागार मंडळ १९८० पर्यंत अस्तित्वात होते.

भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचा निकटचा संबंध लक्षात घेऊन दि. १९ नोव्हेंबर १९६० रोजी 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या वतीने दुर्मिळ पुस्तकांची पुनर्मुद्रणे, अभिजात साहित्यकृतींची भाषांतरे अशा साहित्याची निर्मिती केली जाते. त्याचबरोबर वाङ्मयोपयोगी नवनवे प्रकल्प राबवले जातात, नवलेखकांना प्रकाशनार्थ अनुदान दिले जाते, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान दिले जाते, साहित्य संस्थांची मुखपत्रे असणाऱ्या नियतकालिकांना तसेच अन्य नियतकालिकांनाही अनुदान दिले जाते. ही व अशा स्वरूपाची अनेक कामे साहित्य आणि संस्कृती मंडळ पार पाडत असते. या मंडळाच्या कार्याचा वाढता व्याप लक्षात घेऊन १ डिसेंबर १९८० रोजी विश्वकोश निर्मितीचे कार्य अधिक सक्षमपणे करता यावे यासाठी 'महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ' स्थापन करण्यात आले. त्याच्या वतीने आजवर विश्वकोशाचे एकोणीस खंड प्रसिद्ध झाले आहेत.

महाराष्ट्र शासनाने मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्या संवर्धनासाठी वेगवेगळ्या आस्थापनांची आणि समित्यांची निर्मिती वेळोवेळी केलेली होतीच, तरीही मराठी भाषेसंबंधीचे संशोधन व विकसन यांना विशेष चालना देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दि. १ मे १९९२ रोजी 'राज्य मराठी विकास संस्थेची' स्थापना केली. या संस्थेच्या वतीने संशोधनपर कार्याबरोबरच ग्रंथनिर्मितीही करण्यात येऊ लागली.

महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत नाट्यपरिनिरीक्षण मंडळ, लोकसाहित्य संशोधन मंडळ, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, यांसारख्या महत्त्वाच्या समित्यांची आणि आस्थापनांची निर्मिती केली. मध्यंतरी काही काळ 'विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा'ची स्थापनाही महाराष्ट्र शासनाने केलेली होती. या मंडळाच्या वतीने मराठी भाषा ही उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून उपयोगात आणता येईल असे काही पाठ्यग्रंथ निर्माण केले गेले. परंतु सध्या हे मंडळ अस्तित्वात नाही.

वरील उपक्रमांखेरीज महाराष्ट्र शासनातर्फे साहित्य संमेलने, नाट्यसंमेलने, बालसाहित्य संमेलने या उपक्रमांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते. नाट्यस्पर्धांचे आयोजन केले जाते. मराठी भाषेत निर्माण होणाऱ्या साहित्याचा प्रसार व्हावा आणि सर्वसामान्यपणे वाचनसंस्कृतीचा विकास व्हावा यासाठी प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी ग्रंथोत्सवांचे आयोजन केले जाते. गुणवान ग्रंथनिर्मितीस उत्तेजन मिळावे, यासाठी मराठी भाषेत सातत्याने होत असलेल्या साहित्यनिर्मितीपैकी उत्कृष्ट ग्रंथांना दरवर्षी

पारितोषिके/पुरस्कार दिले जातात. शिवाय लेखकांना आणि कलावंतांना गौरववृत्ती दिली जाते. ज्येष्ठ व श्रेष्ठ लेखक आणि प्रकाशक यांना भरघोस रकमेचे पुरस्कार देऊन त्यांचा दरवर्षी सन्मान केला जातो. याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या वतीने नाट्यस्पर्धा, एकांकिका स्पर्धा, तमाशा शिबिरे, कला महोत्सव, मराठी चित्रपट महोत्सव आयोजित केले जातात. तसेच दरवर्षी २७ फेब्रुवारी या दिवशी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा केला जातो. १ मे या दिवशी 'राजभाषा मराठी दिन' साजरा केला जातो आणि १ मे ते १५ मे या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' हा उपक्रम चालविला जातो. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषा व साहित्य संस्थांना अनुदान दिले जाते. महाराष्ट्र शासनाच्या वतीने अशा प्रकारचे वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. शासनाचे हे अभिनंदनीय कार्य यापुढेही सुरू राहील.

वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्राची राजभाषा म्हणून मराठी भाषेला स्थान देण्यात आलेले असले आणि उपरिनिर्दिष्ट विविध उपक्रमांचे आयोजन नियमाने केले जात असले तरी मराठी भाषेच्या अभिवृद्धीच्या दृष्टीने करण्याजोगे बरेच कार्य अजून व्हावयाचे राहिले आहे. सर्व शासकीय व्यवहार मराठी भाषेत सुरू राहावेत असा धोरणात्मक निर्णय तात्त्विक पातळीवर झाला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारामध्ये मात्र या निर्णयाची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी वेगवेगळ्या कारणांनी होत नाही, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यावर उपाययोजना करण्याच्या हेतूने शासनाने (क्रमांक : भासस - २०१० / प्र. क्र. ७४/२० ब) दि. २२ जून, २०१० रोजी 'भाषा सल्लागार समिती' स्थापन केली. या समितीच्या कामकाजास जून २०१० पासून प्रारंभ झाला. या समितीची पुनर्रचना (महाराष्ट्र शासन, आदेश क्रमांक भासस - २०१३ / प्र. क्र. ३८ / भाषा - ४) दि. ११ ऑक्टोबर २०१३ रोजी करण्यात आली.

आता महाराष्ट्र राज्यात विविध महत्त्वाच्या क्षेत्रांत मराठी भाषेची सद्य:स्थिती कशा प्रकारची आहे, तीविषयी सविस्तर निरीक्षणे मांडता येतील.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली असली तरी या राज्याची राजभाषा म्हणून मराठी भाषेस दि. ११ जानेवारी १९६५ रोजी मान्यता देण्यात आली (महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४). या घटनेस पन्नास वर्षे होत आली तरी जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात मराठी भाषेचा वापर ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे त्या प्रमाणात होताना दिसत नाही. त्या संबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

## २.१. शिक्षण :

कुठल्याही समाजाची जडणघडण करण्याच्या दृष्टीने शिक्षणप्रक्रिया ही केंद्रवर्ती प्रक्रिया असते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत व उच्च शिक्षणाच्या सर्व शाखांमध्ये मराठीचा

माध्यम म्हणून उपयोग केला जाणे अपेक्षित आहे. सध्या मराठी शाळांमध्येच मराठी माध्यमाचा उपयोग केला जातो. परंतु इंग्रजी माध्यमाचे वाढते आकर्षण लक्षात घेऊन काही शाळांमधून आता इ. ५ वी पासून इ. १० वी पर्यंत मराठीबरोबरच इंग्रजी माध्यमही उपयोगात आणले जाते. इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्याही आता मोठ्याप्रमाणात वाढू लागली आहे. अगदी ग्रामीण भागातही इंग्रजी माध्यमाच्या शाळा निर्माण होत आहेत. विशेषत: जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर हा प्रवास वेगाने सुरू झाला. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या शाळांप्रमाणे सी. बी. एस. सी. मंडळ (बोर्ड) आणि विदेशी संस्थांशी संलग्न असलेली मंडळे (बोर्ड) यांच्या प्रमाणातही लक्षणीय वाढ झालेली दिसते. अशा प्रकारच्या सर्व शाळांमध्ये मराठी कुटुंबातील विद्यार्थीही शिकत असतात. त्यांनी मराठीऐवजी अन्य भाषांना अग्रक्रम द्यावा यासाठी येथे उत्तेजन दिले जाते. परिणामी या शाळांमधून मराठी भाषेचे उच्चाटन होऊ लागले आहे. पर्यायाने शालेय शिक्षणातून मराठी माध्यम आणि एक विषय म्हणून मराठीचा अभ्यास व शिक्षण क्रमाक्रमाने कमी होऊ लागलेले आहे. परिणामी सध्या अस्तित्वात असलेल्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ लागली असून या शाळांच्या तुकड्याही कमी होऊ लागल्या आहेत.

हा प्रश्न मराठी भाषेशी जसा संबधित आहे तसा शिक्षणप्रक्रियेशीसुद्धा निगडित आहे. जगभरामध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले जावे, हे सर्वमान्य असलेले तत्त्व आहे. ज्ञानाचे अर्जन तसेच ज्ञानाची निर्मिती ही मातृभाषेतून चांगल्या प्रकारे होऊ शकते हे जागतिक पातळीवर सर्वमान्य झालेले तत्त्व आहे. त्यामुळे जगातील अत्यंत प्रगत असलेल्या राष्ट्रांमध्ये उदा. चीन, जपान, रशिया, जर्मनी, फ्रान्स इत्यादी प्रगत राष्ट्रांमध्ये मातृभाषाच सर्व प्रकाराच्या शिक्षणामध्ये व सर्व पातळ्यांवर माध्यम म्हणून वापरल्या जातात. त्यामुळे ही राष्ट्रे ज्ञाननिर्मितीमध्ये जागतिक पातळीवर आघाडीवर/अग्रेसर आहेत. भारतातदेखील याच कारणासाठी मातृभाषेतून शिक्षण देण्याची प्रथा स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू होती. परंतु अलीकडे मात्र या धोरणाकडे पाठ फिरवण्यात आलेली आहे.

शालेय शिक्षणामध्ये निदान मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी माध्यम आणि मराठी भाषा या दोन्ही गोष्टी आहेत. परंतु उच्च शिक्षणामध्ये विशेषत: विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यवसाय शिक्षणामध्ये इंग्रजी माध्यम हेच एकमेव माध्यम आहे. परिणामत: मराठीमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान व व्यवसाय यासारख्या ज्ञानशाखांसंबंधीचे फारसे लेखन आढळत नाही. ही स्थिती निश्चितच चिंताजनक आहे. मराठी माध्यमामध्ये या विषयासंबंधीची पुस्तके नसल्यामुळे मराठी माध्यमातून अध्ययन आणि अध्यापन होत नाही आणि मराठीतून अध्ययन-अध्यापन होत नसल्यामुळे पाठ्यपुस्तके तयार होत नाहीत, असे हे दुष्टचक्र आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, कायदेविषयक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण कोणत्या माध्यमातून घ्यावयाचे याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्याला असले पाहिजे. अशा प्रकारचे स्वातंत्र्य हिंदी भाषिक प्रदेशात तसेच दक्षिणेकडील काही राज्यांमध्ये विद्यार्थ्यांना आहे. त्यामुळे विज्ञानाची पदवी तेलुगू किंवा हिंदी यांसारख्या प्रादेशिक भाषांमधून विद्यार्थ्यांना

मिळविता येते. यातील काही विद्यार्थी आय. आय. टी. सारख्या संस्थांमधून प्रवेश मिळविताना दिसतात. भारतीय प्रशासन सेवेमध्ये परीक्षार्थींना ऐच्छिक विषय म्हणून मराठी भाषा हा विषय जसा घेता येतो, त्याप्रमाणेच एकूण परीक्षेचे माध्यम म्हणूनही मराठी भाषा निवडता येते. परंतु विज्ञान-तंत्रज्ञान इत्यादी ज्ञानशाखांतील उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा वापर करता येत नाही.

मराठी भाषा हा विषय ज्या शाळांमध्ये नाही अशा शाळांमधून शिकून बाहेर पडलेले विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणापर्यंत मराठी भाषा टाळूनही पुढे जाऊ शकतात ही बाब निश्चितच स्पृहणीय नाही.

शालेय शिक्षण संपल्यानंतर मराठी भाषा हा वैकल्पिक विषय घेऊन पदवी, पदव्युत्तर पातळीवरचे शिक्षण घेण्याची सोय महाराष्ट्रात सर्व विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहे. एम. ए. नंतर एम. फिल. व पीएच. डी. या उच्च पातळीवरील पदव्याही विद्यार्थी संपादन करू शकतात. तथापि, अशा सर्व विद्यावान विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी जवळजवळ उपलब्ध नाहीत. विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची ही मूलभूत समस्या आहे. अशा प्रकारे बेरोजगारी आल्यामुळे मराठी भाषेबद्दल त्यांच्या मनात दुरावा निर्माण होत आहे. तसेच रोजगाराची संधी उपलब्ध होत नसल्याने समाजात एकंदर मराठी भाषेसंबंधी अनास्था निर्माण होत आहे. तसेच मराठी भाषा निरुपयोगी आहे, अशी भावनाही समाजात प्रबळ होताना दिसते आहे.

कृषी विद्यापीठे, मत्स्य विद्यापीठे, तंत्रशिक्षण विद्यापीठे, आय. आय. टी., वैद्यकीय व कायदाविषयक शिक्षण आणि व्यवस्थापनविषयक शिक्षण देणाऱ्या संस्था यांमधूनही मराठी भाषेचा कुठल्याही प्रकारचा अभ्यासक्रम नसतो. आय. आय. टी. मध्ये इंग्रजी आणि सामाजिक शास्त्रांचा अभ्यास केला जातो, मात्र मराठी भाषेच्या अभ्यासाला त्यात स्थान नाही. कृषी विद्यापीठे ही मुख्यत: ग्रामीण जनजीवनाशी संबंधित असतात. येथे ग्रामीण जनतेचे व्यवहार मराठी भाषेतून होतात. त्यामुळे तेथे मराठी माध्यम असणे गरजेचे आहे. परंतु तेथेही माध्यम इंग्रजी असते.

जगभरात विज्ञान-तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि इतर ज्ञानाचा फार मोठ्याप्रमाणात उदय व विस्तार होत आहे. परंतु हे ज्ञान मराठी माणसापर्यंत नेण्याची कोणतीही व्यवस्था महाराष्ट्रात उपलब्ध नाही. फ्रान्स, जर्मनी, जपान, रशिया, चीन यांसारख्या प्रगत देशांमध्ये जगभरातील सर्व विद्याशाखांमधील नवे ज्ञान, तंत्रज्ञान त्या त्या देशांच्या भाषांमध्ये भाषांतरित करून देशातील जनतेस उपलब्ध करून दिले जाते. तशी कुठलीही यंत्रणा मराठी भाषेसाठी उपलब्ध नाही. सध्या विद्यापीठातून विज्ञान-तंत्रज्ञान आणि कला यांचा इतिहास मराठी भाषेतून शिकवला जात नाही.

### २.२. न्यायव्यवस्था :

जिल्हा न्यायालयांपर्यंतचे निकालपत्रांसह सर्व व्यवहार मराठीमधून व्हावेत, अशा प्रकारची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या वतीने काढण्यात आलेली आहे (अधिसूचना - दि. २१ जुलै १९९८). तरीही महाराष्ट्रातील बहुसंख्य तालुका आणि जिल्हा पातळीवरील न्यायालयांमध्ये मराठी

भाषेत निकालपत्रे दिली जात नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे. वस्तुतः न्यायालये ही सामान्य माणसांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी असतात. त्यांना समजेल-उमजेल अशा भाषेत न्यायालयातील सर्व व्यवहार झाले पाहिजेत आणि निकालपत्रेही सर्वसामान्यांना समजणाऱ्या म्हणजे मराठी भाषेमध्ये दिली गेली पाहिजेत. उच्च न्यायालयांमध्ये सर्वत्र इंग्रजी भाषेचा वापर होत असल्यामुळे सामान्य माणसाला न्यायप्रक्रिया समजून घेणे अतिशय अवघड झाले आहे. त्याला पदोपदी वकिलांवर किंवा इतर लोकांवर अवलंबून राहावे लागते. हे एक प्रकारचे सामान्य माणसाचे शोषणच होय. न्यायव्यवस्थेमध्ये मराठी भाषा वापरली न जाण्याचे कारण कायद्याचे संपूर्ण शिक्षण मराठी भाषेमध्ये दिले जात नाही, हे आहे. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे उच्च न्यायालयात कामकाज करणाऱ्या मंडळींना इंग्रजी भाषेत व्यवहार करणे हे प्रतिष्ठेचे आणि जनसामान्यांच्या मराठी भाषेत कामकाज करणे हे गावंढळपणाचे वाटते. त्यामुळे सफाईदार इंग्रजी बोलता-लिहिता न येणाऱ्या बहुसंख्य जनतेच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो आणि हे सर्व काहीतरी आपल्या आवाक्यापलीकडचे आहे, असे वाटून त्यांच्या मनात पराधीनतेची भावना उत्पन्न होते. ही परिस्थिती तत्काळ दूर करणे गरजेचे आहे. उच्च न्यायालयांमध्ये प्राधिकृत भाषा म्हणून त्या त्या प्रांतांच्या राजभाषेला मान्यता मिळावी, यासाठी काही राज्ये प्रयत्नशील आहेत. असे प्रयत्न मराठी भाषेसाठी मात्र होताना दिसत नाहीत.

महाराष्ट्राखेरीज इतर प्रांतांत उच्च न्यायालयाची नावे त्यांच्या प्रांतांच्या नावावरून दिली जातात. उदा. गुजरात उच्च न्यायालय. परंतु महाराष्ट्रातील उच्च न्यायालयाचे नाव मात्र 'बॉम्बे हायकोर्ट' असे आहे.

**२.३. प्रशासन :**

अ) वर्जित प्रयोजने वगळता महाराष्ट्र शासनामध्ये ८५ टक्के व्यवहार मराठी भाषेमध्ये होतात. परंतु वेगवेगळ्या समित्यांचे अहवाल तसेच विधिमंडळामध्ये सादर होणारी सर्व विधेयके, अध्यादेश, अधिसूचना, नियम या सर्व बाबी प्रथमतः इंग्रजी भाषेमध्ये सादर होतात व त्यानंतर त्यांचे मराठीकरण केले जाते. वस्तुतः उपरोक्त सर्व बाबी प्रथमतः मराठी भाषेमध्ये सादर केल्या जाव्यात, असा आदेश महाराष्ट्र शासनाने क्रमांक ओएफएल-१०९५/७३७/प्र.क्र.३६/९५/२० ब, दि. २२ ऑगस्ट १९९५ रोजी निर्गमित केलेला असून, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही, असे सखेद नमूद करावसे वाटते.

ब) अनेक शासकीय कार्यालयांचे आदेश, नियम, अधिनियम, इत्यादी बाबी इंग्रजीमधून तयार होतात. वस्तुतः या सर्व बाबी त्या त्या कार्यालयांनी मुळात मराठी भाषेतच केल्या पाहिजेत, असा आदेश महाराष्ट्र शासनाने दिनांक २२ ऑगस्ट १९९५ रोजी निर्गमित केलेला आहे. तथापि, त्यानुसार कार्यवाही मात्र होत नाही.

क) शासकीय आदेश, अध्यादेश, अधिसूचना, नियम इत्यादींचे मराठी भाषेत भाषांतर करताना योजल्या जाणाऱ्या मराठी भाषेचा दर्जा कृत्रिम व यांत्रिक असतो. या भाषेत जी अत्यावश्यक सहजता असावयास हवी ती असत नाही.

ड) शासकीय कार्यालयांमध्ये जेथे मराठी भाषेचा आवर्जून वापर होत असतो तेथे भाषेचा दर्जा पुष्कळदा समाधानकारक असत नाही. विशेषत: सीमावर्ती भागात असणाऱ्या शासकीय कार्यालयांमध्ये प्रशासकीय मराठी भाषेचा वापर अतिशय सदोष पद्धतीने होतो. तसेच एकूण दर्जाही समाधानकारक असत नाही. त्यामुळे कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

इ) विद्यापीठे, संशोधन संस्था, इतर अ-शासकीय किंवा निमशासकीय संस्था यांमधील कारभार फार मोठ्याप्रमाणात इंग्रजी भाषेमध्ये होतो. अ-मराठी भाषकांशी संबंध येत असल्यामुळे असे घडते, हे कारण या संस्थांच्या वतीने दिले जाते. हे कारण पुढे करून सर्वच व्यवहार गरज नसताना इंग्रजी भाषेमध्ये केले जातात.

फ) जनसामान्यांशी संबंधित असणाऱ्या सहकार खात्यातील प्रशासन व्यवहार इंग्रजी भाषेत होतात.

ग) सिडको, म्हाडा, वीज मंडळ यांसारख्या शासकीय पुढाकाराने सुरू झालेल्या संस्थांचे व्यवहारही इंग्रजी भाषेतच होत असतात. एवढेच नव्हे तर, त्यांची नावे शासन निर्णयामध्ये मराठी व इंग्रजी भाषेत असतात. परंतु काही वैधानिक नोंदण्या इंग्रजी भाषेतील नावांनी केल्यामुळे तिच नावे अधिकृत ठरतात. राजपत्रात इंग्रजी भाषेत भाषांतरित नावांचा उल्लेख असल्याने या संस्थांच्या इंग्रजी भाषेच्या नावांचा वापर बंधनकारक ठरतो.

**२.४. वित्त संस्था :**

अ) सध्या महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रदेशातील बँका कार्यान्वित झालेल्या आहेत. तसेच नवनव्या बँकांचेही आगमन होत आहे. यातील बहुसंख्य बँकांचे कामकाज हे इंग्रजी भाषेमधूनच चालते. वस्तुत: केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेमध्येही हा कारभार चालला पाहिजे. या संदर्भात बँकांमधील कर्मचारी 'संगणकामध्ये मराठी भाषेची सोय नाही' अशी सबब सांगतात किंवा एकूणच मराठी भाषेतून कागदपत्रे देण्याबाबत टाळाटाळीचे धोरण अवलंबितात. बँकांमधून हिंदी भाषेतून व्यवहार होतात की नाही, हे पाहण्यासाठी व ते व्हावेत, यासाठी हिंदी भाषा अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली असते. परंतु मराठी भाषेतून कामकाज व्हावे, यासाठी अशी कुठलीही तरतूद करण्यात आलेली नाही.

ब) जिल्हा कोषागारापासून ते मंत्रालयापर्यंतच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील वेतन देयके, यांत्रिक हजेरीपत्रके व अन्य देयके या सर्वांसाठी इंग्रजी भाषेचा सर्रास वापर केला जातो.

क) कर्ज पुरवठा करणाऱ्या सर्व संस्थांचे कारभार इंग्रजी भाषेमध्येच होतात.

**२.५. उद्योगजगत :**

औद्योगिक जगतातील बहुतेक व्यवहार हे इंग्रजी भाषेमधूनच होतात. विशेषत: बहुराष्ट्रीय कंपन्या जेव्हा महाराष्ट्रात येतात तेव्हा त्यांचे प्रशासन, परस्परसंप्रेषण, उत्पादनविषयक साहित्यनिर्मिती, जाहिराती, माहिती-पत्रके इत्यादी सर्व प्रकारचे व्यवहार इंग्रजी भाषेमधूनच होतात. जी उत्पादने तयार होतात त्यावर टाकण्यात आलेली नावे व त्यासोबतची माहिती-पत्रके व जाहिराती या सर्व गोष्टी इंग्रजी भाषेमध्ये असतात. कंपन्यांमधील वातावरण प्राधान्याने अ-मराठी असते. परिणामत: मराठी भाषकांना आपण व आपली भाषा यांचा दर्जा दुय्यम आहे, याची तीव्र जाणीव होते. तसेच इंग्रजी भाषेत संज्ञापन न साधता आल्यामुळे मराठी भाषकांची कुचंबणा होते.

औद्योगिक विकासाची प्रगती साधण्यासाठी शासनाच्या पातळीवर ज्या विविध आस्थापनांची व कार्यालयांची निर्मिती होते, त्यांची नावे इंग्रजी भाषेत असतात. इतकेच नव्हे तर, त्यांची माहिती-पत्रके, तेथील अर्ज, त्यांचा सर्वसाधारण कारभार तसेच सेवाविषयक सर्व बाबी इंग्रजी भाषेच्या आधारेच केल्या जातात.

**२.६. प्रसारमाध्यमे :**

सध्या मराठी दूरचित्रवाणी वाहिन्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्याप्रमाणात वाढत चाललेली आहे. या वाहिन्यांवरील मराठी भाषेचा वापर अत्यंत बेजबाबदारपणे होतो आहे. तसेच राष्ट्रीय वाहिन्यांवरून जे वेगवेगळे कार्यक्रम प्रसारित केले जातात, त्यांचा बोध घडावा म्हणून तेथे तेलुगू, कन्नड, बंगाली, हिंदी इत्यादी भाषांचे साहाय्य पुरविले जाते. परंतु अशा प्रकारचे साहाय्य पुरवल्या जाणाऱ्या भाषांत मराठी भाषेला स्थान दिले जात नाही. विशेषत: लहान मुलांचे जे कार्यक्रम प्रसारित होतात, तेथे अशा प्रकारचे साहाय्य अनिवार्य आहे. उदा. छोटा भीम, मिकी माऊस, शिनचेन, कृष्णा, हनुमान इत्यादी मालिका. तसेच लहान मुलांवर मराठी भाषेचे संस्कार होतील, असे कुठलेही कार्यक्रम जाणीवपूर्वक कुठल्याही वाहिनीवर प्रसारित केले जात नाहीत.

महाजाल (इंटरनेट), माहिती तंत्रज्ञान, सामाजिक संपर्कमाध्यमे (सोशल मीडिया/नेटवर्क), भ्रमणध्वनी (मोबाइल), यांसारख्या क्षेत्रांमध्ये मराठीचा वापर करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत.

वृत्तपत्रांमध्ये वापरली जाणारी मराठी भाषा पुष्कळदा सदोष असते. 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया' व तत्सम अशा संस्था आपली वार्तापत्रे फक्त इंग्रजी आणि हिंदी भाषेमध्येच पाठवतात व त्याचा अनुवाद

मराठी वर्तमानपत्रांमधून होत असतो. त्यामुळेही अनेक प्रश्न निर्माण होतात. उदा. चुकीचे प्रस्तुतीकरण, दिशाभूल करणारे भाषांतर इ.

वृत्तपत्रांमधील मुद्रित-शोधन सदोष असते. तसेच मराठी भाषेत प्रतिशब्द उपलब्ध असताना, काही वर्तमानपत्रे सर्रासपणे इंग्रजी भाषेतील शब्दांचा वापर करतात.

पुष्कळदा पत्रकार परिषदा यादेखील आवश्यकता नसतानाही इंग्रजी भाषेमध्ये होताना दिसतात.

महाराष्ट्र शासनाच्या जाहिराती या मराठी भाषेत असल्या पाहिजेत अशा प्रकारचे परिपत्रक (शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२००८/५९६/प्र.क्र.८४/०८/२० ब, दि. १३.८.२००८) असतानाही पुष्कळदा वृत्तपत्रात मराठी भाषेत जाहिराती दिल्या जात नाहीत. महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांच्या व वित्तीय संस्थांच्या जाहिराती प्रामुख्याने इंग्रजी भाषेतच असतात.

**२.७. बोली :**

आज महाराष्ट्रात अहिराणी, हळबी, वऱ्हाडी, डांगी, नागपुरी इत्यादी प्रमुख बोलींसह विविध जाती-जमातींच्या स्वतंत्र बोली अस्तित्वात आहेत, असे आढळून येते. उदा. भटक्या जमातींच्या स्वतंत्र बोली, आदिवासींच्या स्वतंत्र बोली. या बोलींचा वापर करणाऱ्या सर्वांच्या एकूण जीवनव्यवहारात व विशेषत्वाने शिक्षणामध्ये प्राथमिक पातळीवरील आकलनापासूनच्या अडचणी येतात. या बोलींमध्ये वेगवेगळ्या कालखंडातील भिन्नभिन्न भाषिक रूपे आढळतात, तसेच या बोलींचा संबंध वेगवेगळ्या प्राकृतांशी जोडला जातो. असे असूनदेखील या सर्व बोलींची नोंद, संकलन, संशोधन व सखोल अभ्यास अद्यापि झालेला नाही.

**२.८. प्रमाणीकरण :**

कुठल्याही भाषेमध्ये तिचे प्रमाणीकरण करण्याची यंत्रणा अत्यावश्यक असते. ती तशी असल्याशिवाय सर्वसाधारण जीवनव्यवहार व ज्ञानव्यवहार सुरळीतपणे पार पडू शकत नाही. हे लक्षात घेऊन काही देशांनी प्रमाणीकरणाची कायम स्वरूपी यंत्रणा निर्माण केलेली आहे (उदा. जर्मनी). मराठी भाषेतील शब्द व पदरचना यांचे प्रमाणीकरण करणारी अशा स्वरूपाची कोणतीही यंत्रणा आज अस्तित्वात नाही.

**२.९. इतर व्यवहार :**

अ) वर निर्देशित केलेल्या क्षेत्रांखेरीज अन्य जीवनक्षेत्रांतही मराठी भाषेच्या वापराची सद्य:स्थिती समाधानकारक नाही. वेगवेगळ्या गृहनिर्माण संस्थांसह सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल, लेखापरीक्षणाचे अहवाल, बैठकांचे कार्यवृत्तान्त इत्यादी सर्व गोष्टी इंग्रजी भाषेमधूनच सादर केल्या जातात. याला सहकारी साखर कारखान्यांसारख्या काही सहकारी संस्था अपवाद आहेत.

ब) मराठी माणसांच्या मनात मराठीत बोलण्या-लिहिण्यासंबंधीचे न्यूनगंड असल्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी आढळते. मराठी शाळांची संख्या

दिवसेंदिवस रोडावत चालली आहे, तसेच मराठी माध्यमातून शिकण्याचा कलही दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. त्यामुळे मराठी शाळांच्या तुकड्या कमी होताना दिसत आहेत. रोजगाराचे एक साधन म्हणून मराठी भाषेच्या उपयुक्ततेविषयी मराठी माणूस साशंक झाला आहे.

क) मराठी भाषेमधून व्यवहार करण्यासाठी मराठी माणूस फारसा आग्रही असत नाही. उदा. दुकानात गेल्यानंतर मराठी भाषेत बोलण्याऐवजी तो हिंदी अथवा इंग्रजी भाषांमध्ये बोलण्याला प्राधान्य देतो. दुकानांवरील पाट्या व इतर ठिकाणचे फलक मराठी भाषेत असणे बंधनकारक आहे, पण प्रत्यक्षात ते इंग्रजी भाषेत असतात. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र. ओएफएल-१०६१-एम, दि. १० जानेवारी, १९६१ आणि क्र. मभावा-१०६५-म, दि.१ सप्टेंबर १९६५ अन्वये उपरोक्त संदर्भात आदेश निर्गमित करूनही त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही.

द्रुतगती मार्गावरील सूचना, रुग्णवाहिका, तातडीची मदत मिळविण्यासाठीचे दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक मराठी भाषेतून असणे हे अत्यंत गरजेचे आहे, परंतु तसे ते नसतात.

ड) रुग्णालयासारख्या ठिकाणी काम करणाऱ्या डॉक्टर व इतर कर्मचारी वर्ग यांना मराठी भाषेतून रुग्णांशी संवाद करण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण देण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे रुग्णांना आपला आजार व त्यावरील उपाययोजनेसंबंधी डॉक्टरांशी अथवा परिचारिकांशी संवाद साधणे शक्य होत नाही.

इ) व्यवसाय व नोकरी या निमित्ताने आज एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जाणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढलेले आहे. महाराष्ट्रातील लोक बाहेरच्या राज्यात जसे जातात; तसेच बाहेरच्या प्रांतांतूनही महाराष्ट्रात पुष्कळ लोक येत असतात. अशा येणाऱ्या लोकांना मराठी भाषा शिकविण्याची कुठलीही सुविधा उपलब्ध नाही.

फ) जागतिकीकरणाच्या काळात व्यापार, उद्योग व इतर अनेक व्यवहारांमध्ये मराठी भाषेतील मजकूर तसेच मराठी भाषेतील चांगले साहित्यही इतर भाषांमध्ये जाणे गरजेचे झाले आहे. परंतु यासाठी कुठलीही यंत्रणा महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात नाही.

ग) महाराष्ट्रातल्या विमानतळावरून उड्डाण करणाऱ्या विमानांमध्ये मराठी भाषेतील वर्तमानपत्रे दिली जात नाहीत. तसेच उद्घोषणाही मराठी भाषेतून होत नाहीत.

ह) सध्या महाराष्ट्रातल्या विविध विद्यापीठांमधून मराठी भाषा आणि साहित्य यासंबंधीचे संशोधन चालू आहे. तरीही एकूणच लोकजीवनाचे, भाषेचे आणि साहित्यसंस्कृतीचे संशोधन अधिक व्यापक प्रमाणात होणे आवश्यक आहे. हे कार्य करणारी संशोधन संस्था सध्या अस्तित्वात नाही.

संशोधनाला साहाय्यभूत ठरतील अशी व ललित साहित्यनिर्मितीला प्रेरक ठरतील अशी दर्जेदार नियतकालिके मराठी भाषेमध्ये अत्यल्प आहेत.

ळ) विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जे संशोधन होते त्याची जागतिक पातळीवर नोंद घेणारी म्हणजेच उद्धृत सूची (सायटेशन इंडेक्स) दर्शविणारी यंत्रणा कार्यरत असते. परंतु अशी यंत्रणा सामाजिक शास्त्रे व भाषा यांच्या संदर्भात भारतामध्ये कुठेही उपलब्ध नाही. मराठी भाषेच्या संदर्भात अशा प्रकारे उद्धृत सूची व प्रभावक्षमता (सायटेशन इंडेक्स व इम्पॅक्ट फॅक्टर दर्शवणारी) नोंदविणारी कुठलीही यंत्रणा नाही.

वर नमूद केलेली मराठी भाषेची सद्य:स्थिती लक्षात घेता ती फारशी समाधानकारक नाही असे म्हणावे लागते. तिच्या अभिवृद्धीसाठी कालबद्ध स्वरूपाचे ठोस कार्यक्रम हाती घेणे व पार पाडणे हे अपरिहार्य झाले आहे.

असा कालबद्ध कार्यक्रम आखणे व त्याची अंमलबजावणी करणे यासाठीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

■

# म

□

## भाग तीन

## । मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे ।

। मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे ।

मराठी भाषेचा विचार हा महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती व एकंदर जीवनव्यवहार यांच्याशी संबंधित असणारे प्राणभूत तत्त्व आहे. महाराष्ट्राचे मराठी भाषेशी असणारे नाते जैविक स्वरूपाचे आहे. त्यामुळे मराठी भाषेचा वापर हा केवळ अस्मितेचा प्रश्न नसून तो मराठी माणसाच्या अस्तित्वाचाही प्रश्न आहे. तसेच सर्वसामान्य माणसाच्या जगण्याशी व महाराष्ट्राच्या विकासाशी निगडित हा प्रश्न आहे. हे सातत्याने दृष्टीपुढे ठेवून पुढील उद्दिष्टे आणि धोरणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. येत्या २५ वर्षांत महाराष्ट्रात मराठी भाषेला सर्व पातळ्यांवर स्थैर्य लाभावे या दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

२. समाजमानसात मराठी भाषेविषयी आत्मीयता उत्पन्न करणे.

३. जनमानसातील मराठी भाषेविषयीचा न्यूनगंड दूर करणे.

४. मराठी भाषेच्या साहाय्याने आपले भवितव्य उज्ज्वल होऊ शकेल असे आश्वासक वातावरण निर्माण करणे.

५. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लोकभाषा या ज्ञानभाषा झाल्या पाहिजेत, अशी भूमिका घेतली होती. या भूमिकेची पूर्तता करण्यासाठी मराठीत विविध ज्ञानशाखांची अद्ययावत आणि गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तके आणि संदर्भ पुस्तके निर्माण करणे. एकंदरीत येत्या २५ वर्षात मराठी भाषा जागतिक पातळीवर ज्ञानभाषा म्हणून विकसित करणे.

६. प्रशासकीय क्षेत्रात मराठी भाषेचा शंभर टक्के वापर करणे. शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील आर्थिक व्यवहारांसह सर्व व्यवहारात मराठी भाषेचा अवलंब करणे.

७. सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय व्यवहाराची मराठी भाषा विकसित करणे.

८. तालुका व जिल्हा स्तरावरील न्यायालयांमधून मराठी भाषेचा संपूर्ण वापर होईल अशी व्यवस्था

निर्माण करणे. तसेच उच्च न्यायालयात मराठी भाषेला प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळवून देणे.

९. शालांत पातळीवर व विद्यापीठीय स्तरावरील सर्व विद्याशाखांमध्ये (माध्यम कोणतेही असले तरी) मराठी हा विषय अनिवार्य ठरवणे.

१०. ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, वैद्यकशास्त्र, विधी व अभियांत्रिकी इत्यादी सर्व ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षणासाठी मराठी माध्यम उपलब्ध करून देणे.

११. राष्ट्रीयीकृत अधिकोषांसह (बँकांसह) सर्व अधिकोष/बँकांमधील व्यवहार मराठी भाषेत होतील, हे कटाक्षाने पाहणे.

१२. व्यापार, उद्योग, सहकार, सेवा आणि इतर वित्तीय क्षेत्रे यातील लेखापरीक्षणासह सर्व व्यवहार मराठी भाषेत होतील याची दक्षता घेणे.

१३. प्रसारमाध्यमांचा उपयोग मराठी भाषेच्या विकासासाठी व प्रसारासाठी प्रभावीपणे करणे.

१४. जनसंपर्काच्या पारंपरिक आणि आधुनिक माध्यमांमध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करणे.

१५. जीवन व्यवहारातील नित्योपयोगासाठी उदा. परस्पर संप्रेषण, प्रशासकीय व्यवहार, रुग्णालये इत्यादी विविध ठिकाणी मराठी भाषेचा सहज वापर व्हावा या दृष्टीने भाषिक कौशल्य विकसित करणे.

१६. क्रीडाविषयक उपक्रमांची माहिती तसेच प्रसारणविषयक सर्व बाबी मराठी भाषेत येतील हे पाहणे.

१७. अ-मराठी भाषकांना मराठी भाषा शिकवण्याची यंत्रणा निर्माण करणे.

१८. नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मराठी भाषेचा जगभर प्रसार करणे.

१९. महाराष्ट्रातील लोककलांचा विकास होईल व त्याबरोबरच लोककलांच्या माध्यमातून मराठी भाषेचा विकास होईल हे पाहणे.

२०. महाराष्ट्रातील विविध बोलींचे सर्वेक्षण करणे.

२१. मराठी भाषा समृद्ध होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील विविध बोलींचे शब्दकोश तयार करणे.

२२. मराठी भाषेत सकस साहित्यकृतींची निर्मिती आजवर होत आली आहे. त्यात अधिकाधिक भर पडावी या दृष्टीने प्रेरणादायी व प्रोत्साहनपर वातावरण निर्माण करणे.

२३. गाव/प्रभाग तेथे ग्रंथालय हा उपक्रम राबवणे व त्याद्वारे वाचन संस्कृतीचा विकास करणे.

२४. महाराष्ट्राच्या सर्व विद्यापीठांमधून भाषेच्या सखोल अध्यापनाची सोय उपलब्ध करून देणे.

२५. मराठी माध्यमाच्या शाळांची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करणे.

२६. मराठी भाषेसमोरील आव्हाने कोणती आहेत याचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे.

२७. शासनाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या मराठी भाषाविषयक उपक्रमांसाठी मराठी भाषक अधिकाऱ्यांची नेमणूक करणे.

२८. विविध प्रकारच्या लोककथा, लोकगीते, लोककला यांच्या संहिता संकलित व प्रकाशित करणे.

२९. मराठी भाषेतील जुनी हस्तलिखिते, शिलालेख, ताम्रपट तसेच ऐतिहासिक दस्तऐवज संकलित व प्रकाशित करणे.

३०. मराठी भाषेची शब्दसंपत्ती गोळा करण्यासाठी व मराठी भाषाविषयक इतर उपक्रमात सर्वांना सहभागी करून घेण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचे उपयोजन करणे.

३१. मराठी भाषेच्या विकासाचा इतिहास दृक्‌श्राव्य स्वरूपात जतन करणे.

३२. एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत स्वीकारण्याची प्रक्रिया जगभर सुरू असते. त्याचप्रमाणे मराठी भाषेतही अन्य भाषेतील शब्द आलेले आहेत. यापैकी कोणते शब्द प्रमाण मानावेत हे ठरविण्यासाठी म्हणजेच मराठी भाषेच्या प्रमाणीकरणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे.

३३. समाजातील वंचित घटक व शारीरिकदृष्ट्या दुर्बल घटक यांमधून येणाऱ्या मुला/मुलींच्या भाषिक क्षमता विकसित करणे.

३४. मराठी भाषकांची भाषिक क्षमता विकसित करण्यासाठी ठिकठिकाणी भाषा प्रयोगशाळा उभारणे.

३५. या प्रयोगशाळांचा वापर ज्यांना मराठी भाषा येत नाही, त्यांना मराठी भाषा शिकविण्यासाठीही करता येईल.

३६. बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषकांच्या समस्यांचे निराकरण करणे व त्यांच्या भाषाविषयक उपक्रमांना साहाय्य करणे.

३७. भारतातील आणि जगभरातील भाषांमधून निर्माण होणारे चांगले आणि दर्जेदार साहित्य मराठी भाषेत आणणे आणि मराठी भाषेतील चांगले साहित्य इतर भाषांत नेणे यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारणे.

३८. विज्ञान-तंत्रज्ञानाचा पूर्वेतिहास आणि व्याप्ती ग्रंथबद्ध करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करणे.

३९. मराठी भाषेच्या विकासासाठी जे जे करणे आवश्यक असेल त्या त्या उपाययोजना करणे.

■

# म

□

## भाग चार

## । मराठी भाषाविषयक धोरणासंबंधीच्या शिफारशी ।

**१) शिफारशी**

४.१.१. शिक्षण

४.१.२. उच्च माध्यमिक शिक्षण

४.१.३. उच्च शिक्षण

४.१.४. न्यायालयातील कामकाजात मराठीचा वापर

४.१.५. प्रशासन

४.१.६. वित्तीय संस्था

४.१.७. उद्योगजगत

४.१.८. प्रसारमाध्यमे

४.१.९. नव तंत्रज्ञान आणि मराठीचा वापर

४.१.१०. अन्य महत्त्वाच्या बाबी

**२) शिफारशींच्या अंमलबजावणीसाठीचा कालबद्ध कार्यक्रम**

। मराठी भाषाविषयक धोरणासंबंधीच्या शिफारशी ।

**४.१. शिफारशी :**

मराठी भाषेची सद्य:स्थिती आणि मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे या दोहोंच्या प्रकाशात मराठी भाषेविषयीचे पुढील २५ वर्षांचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. हे धोरण ठरविताना जागतिकीकरणाचे मराठी भाषेवर झालेले परिणाम, तसेच भविष्यातील आव्हाने, यांना सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी कोणती पावले उचलावी लागतील याचा विचार करण्यात आलेला आहे. हे धोरण ठरविताना जीवनव्यवहाराची विविध अंगे विचारात घेतली आहेत. त्यात शिक्षण, न्यायव्यवस्था, प्रशासन, वित्त संस्था, उद्योगजगत, प्रसारमाध्यमे, नवे तंत्रज्ञान या क्षेत्रांचा प्रामुख्याने विचार केला आहे. याशिवाय अन्य महत्त्वाच्या बाबीही विचारात घेतल्या आहेत. या सर्वांमधून 'अमृतातेही पैजा जिंकणारी' मराठी भाषा ही जगातील अग्रक्रमाची भाषा व्हावी, हा या शिफारशींमागील व्यापक हेतू आहे.

**४.१.१. शिक्षण :**

शिक्षण आणि भाषिक विकास हे परस्परावलंबी घटक होत. शिक्षण हे मातृभाषेतूनच प्रभावीपणे दिले जाऊ शकते, हे जगन्मान्य तत्त्व आहे. भारताचा आजवरचा इतिहास लक्षात घेता भारतातील थोर विचारवंत, प्रतिभावंत, शास्त्रज्ञ, पुढारी, उद्योजक इत्यादींचे शिक्षण बव्हंशी त्यांच्या त्यांच्या मातृभाषेतूनच झालेले आहे. मातृभाषेच्या शिक्षणाचे महत्त्व भारत सरकारच्या 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - २००५' यातही अधोरेखित करण्यात आले आहे (प्रकाशक - राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पृ. क्र. ४१ व ४२). महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्राच्या जडणघडणीत मराठी शाळांचा व शिक्षण संस्थांचा सिंहांचा वाटा आहे. तथापि, अलीकडे काही वर्षांत इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रस्थ वाढत चाललेले असल्यामुळे मराठी शाळांकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. भरीस भर म्हणून मराठी शाळेतील

शिक्षकांना व सेवकांना शासकीय पातळीवरील शालाबाह्य कामांत गुंतवले जाते. परिणामत: अध्यापन प्रक्रियेत त्यांचा जेवढा सहभाग असायला हवा तेवढा तो राहू शकत नाही. त्यामुळे मराठी शाळांमधील शिक्षणाची दुरवस्था पाहून बहुसंख्य पालकांना आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांत जावीत असे वाटते.

कोणत्याही भाषेचा विकास हा प्रामुख्याने शिक्षणाचे माध्यम व त्यासाठी असणारा भाषेचा अग्रक्रम यावरच अवलंबून असतो. त्यामुळे शिक्षणाचा अग्रक्रमाने विचार केला आहे.

**अनुदानित असो किंवा विनाअनुदानित असो मराठी शाळा समृद्ध करणे :**

१. महाराष्ट्र हे मराठी भाषकांचे राज्य आहे, आणि मराठी भाषा ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे, हे लक्षात घेऊन मराठी माध्यमाच्या शाळांना अग्रक्रमाने व मोठ्याप्रमाणात मान्यता देण्याचे धोरण त्वरित अंमलात आणले जावे.

२. भारत सरकारच्या 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २०१०' मध्ये समाजातील १४ वर्षांखालील बालकांना शिकवणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने किमान व्यवहार्य अटी पूर्ण करणाऱ्या मराठी माध्यमाच्या शाळांना मोठ्याप्रमाणात मान्यता देण्यात यावी.

३. आज समाजातील गोरगरिबांची जास्तीत जास्त मुले मराठी शाळांमधून शिकतात. परंतु या शाळांमधून शिक्षणविषयक सुविधा अल्प प्रमाणात आढळतात. अशा सर्व शाळांना उत्तम प्रतीच्या शालेय सुविधा पुरवून मराठी शाळा पुढील तीन वर्षांच्या काळात समृद्ध व स्वयंपूर्ण केल्या जाव्यात. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वार्षिक अंदाजपत्रकात या खर्चासाठी भरघोस रकमेची तरतूद करण्यात यावी.

४. सध्या मराठी शाळांच्या तुकड्या कमी होत असल्याचे चित्र दिसत असले तरी अशा तुकड्यांना विद्यार्थी संख्येची अट कमी करून संरक्षण देण्यात यावे.

५. मराठी शाळेतील शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे (प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर) येत्या दोन वर्षांत अग्रक्रमाने भरण्यात यावीत.

६. शिक्षकांना अध्यापन कामाव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय कामे सक्तीची केली जाऊ नयेत.

७. मराठी शाळांबद्दल तयार झालेला न्यूनगंड घालविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घ्यावा, यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या वतीने प्रोत्साहनपर वातावरण निर्माण केले जावे व त्यासाठी काही नवे उपक्रम (उदा. पुरस्कार देणे, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे) राबविण्यात यावेत.

८. मराठी माध्यमांच्या शाळांची गुणवत्ता वाढावी यासाठी 'अ', 'ब' आणि 'क' असा दर्जा ठरविण्याची यंत्रणा निर्माण केली जावी, हे काम येत्या तीन वर्षांत पूर्ण करण्यात यावे आणि

त्यानंतर दर्जानिहाय अनुदान दिले जावे.

९. केंद्र शासनाने ज्याप्रमाणे नवोदय विद्यालये सुरू केलेली आहेत त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनानेदेखील अद्ययावत सोयीसुविधांसह व प्राथमिक पातळीपासून प्रत्येक जिल्ह्यात एक अशी शाळा सुरू करावी. जे जिल्हे शैक्षणिकदृष्ट्या मागास आहेत अशा जिल्ह्यांना त्यामध्ये प्राधान्य देण्यात यावे. त्यानंतर क्रमाक्रमाने महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमधून अशा शाळा सुरू करण्यात याव्यात.

१०. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये (इंग्रजी, गुजराती, हिंदी, उर्दू, कन्नड इ.) प्राथमिक स्तरापासून शालांत स्तरापर्यंत त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषा ही अनिवार्य भाषा केली जावी. या नियमास सी. बी. एस. सी., सिनियर केंब्रिज व तत्सम शाळांमधून हे धोरण येत्या तीन वर्षांत क्रमश: राबविण्यात यावे.

११. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या मराठी विद्यार्थ्यांना इंग्रजीबरोबरच मराठीमधून देखील विषय समजावा यासाठी अभ्यासक्रमाची पुस्तके इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेत असावीत.
उपरोक्त शाळांसाठी मराठी भाषेचा अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, अध्यापन सामग्री व परीक्षा पद्धती निश्चित करण्यासाठी स्वतंत्र मंडळाची निर्मिती त्वरित करण्यात यावी. अभ्यासक्रमाची आखणी व पुनर्रचनेचे काम हे मंडळ सातत्याने करीत राहील.

१२. अ-मराठी माध्यमांच्या शाळांमधून मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी विविध उपक्रम राबविणे अनिवार्य केले जावे. या उपक्रमांचे वार्षिक अहवाल मराठी भाषेत देणे बंधनकारक असावे.

१३. मराठी भाषा ही अध्यापनाची भाषा म्हणून अन्य विषयाच्या शिक्षकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात यावे. अशा प्रशिक्षित शिक्षकांना सेवाविषयक लाभ देण्यात यावेत, अशी तरतूद करण्यात यावी.

१४. राज्य शासनाचा अभ्यासक्रमविषयक आराखडा तयार होताना त्यात व्यवसायाभिमुख भाषिक कौशल्याचा अंतर्भाव आवर्जून केला जावा.

**४.१.२. उच्च माध्यमिक शिक्षण :**

१. उच्च माध्यमिक पातळीवर सर्व विद्याशाखांमधील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मराठी माध्यमही उपलब्ध व्हावे आणि त्या दृष्टीने मराठी माध्यमातील पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जावी.

२. अकरावी-बारावी स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी भाषा हा विषय प्रथम अथवा द्वितीय भाषा म्हणून अनिवार्य करण्यात यावा.

**४.१.३. उच्च शिक्षण :**

१. भारतातील इतर प्रांतांमध्ये ज्याप्रमाणे तेथील विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतून पदवीपर्यंतचे शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रातदेखील सर्व विद्याशाखांमध्ये (वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, विधी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र इत्यादी) मराठी

भाषेतून शिक्षण घेता येईल, अशी व्यवस्था केली जावी.

या शिफारशीची अंमलबजावणी पाच वर्षांच्या कालावधीत पूर्णपणे केली जावी.

२. मराठी माध्यमातून उपरोक्त विद्याशाखांचे शिक्षण देण्यासाठी दर्जेदार पाठ्यपुस्तकांची निर्मिती व्हावी म्हणून त्वरित एका वर्षाच्या आत 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा'चे पुनरुज्जीवन करण्यात यावे व त्याच्यावतीने अभ्यासक्रमाशी संबंधित पाठ्यपुस्तके तयार केली जावीत.

३. सध्या महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यापीठांत मराठी साहित्याच्या अभ्यासावर विशेष भर देणारे विभागच कार्यरत आहेत. या विभागांमधून भाषा या घटकाकडे दुर्लक्ष होत असते. ही परिस्थिती बदलावी यासाठी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत 'मराठी भाषाभ्यास व भाषाविज्ञान' असा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात यावा. ही प्रक्रिया येत्या पाच वर्षांत पूर्ण व्हावी.

४. भारतातील सर्व महत्त्वाच्या विद्यापीठांत मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन सुरू व्हावे या दृष्टीने येत्या दहा वर्षांत तेथे मराठी भाषा अध्यासनांची निर्मिती करण्यात यावी.

५. आज जगभरात विविध ज्ञानक्षेत्रे निर्माण होत आहेत. त्यातील ज्ञान मराठी भाषेतून अनुवादित करून प्रसारित करण्याची यंत्रणा निर्माण करण्यात यावी. या प्रक्रियेमुळे मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून अधिक सक्षम होईल. तसेच जगभरातील ज्ञान मराठी भाषेतून सामान्य माणसाला प्राप्त व्हावे, यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी. यासाठी विश्वकोश निर्मिती मंडळाची यंत्रणा वापरता येऊ शकेल, तसेच सध्या कार्यरत नसलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवनही करता येऊ शकेल.

६. अभियांत्रिकी, विधी, तंत्रज्ञान, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र, स्थापत्यशास्त्र यांसारख्या विद्याशाखांमधून त्या त्या विद्याशाखेशी संबंधित मराठी भाषेचा स्वतंत्र अभ्यासक्रम आखून तो राबविण्यात यावा आणि किमान १६ श्रेयांक (ग्रेड) असलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे बंधन विद्यार्थ्यांवर असावे.

७. विद्यापीठांतून विज्ञान-तंत्रज्ञान आणि कला यांचा इतिहास मराठी भाषेतून शिकवला जावा.

८. जगभरात विज्ञान-तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे यांमध्ये सतत संशोधन चालू असते. हे संशोधन त्वरित मराठीमध्ये अनुवादित करण्याची यंत्रणा निर्माण केली जावी. त्यामुळे ज्ञानक्षेत्रात कार्य करणारा मराठी माणूस अद्ययावत ज्ञानाशी जोडला जाईल.

९. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी व तिचा वापर जीवनाच्या सर्व क्षेत्रात व्हावा, यासाठी स्वतंत्र मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन करण्यात यावे.

## मराठी भाषा विद्यापीठ

महाराष्ट्रात वर्धा येथे 'हिंदी केंद्रीय विद्यापीठ' आहे. तसेच रामटेक येथे महाराष्ट्र शासनाने संस्कृत भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांत त्या त्या भाषेचे संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठांची स्थापना करण्यात आलेली आहे. उदा. कन्नड, तमिळ, तेलुगू भाषांसाठींची स्वतंत्र विद्यापीठे संबंधित राज्यांनी निर्माण केलेली आहेत. कर्नाटक शासनाने कोकणी भाषेचा अभ्यास करणारी आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्वतंत्र संस्था स्थापन केलेली आहे. संस्कृत भाषेचे राष्ट्रीय पातळीवरील महत्त्व लक्षात घेऊन देशभरातील इतर राज्यांतही संस्कृत विद्यापीठे स्थापन झालेली आहेत. तसेच हिंदी भाषेचा विशेष अभ्यास करणारी विद्यापीठेही भारतात कार्यरत आहेत. हैद्राबाद येथे इंग्रजी व इतर परकीय भाषांचे अभ्यास करणारे स्वतंत्र विद्यापीठ आहे.

मराठी भाषा ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा होऊन अर्धशतकाहून अधिक कालावधी उलटून गेला आहे. तरीही महाराष्ट्रात मराठी भाषेच्या स्वतंत्र विद्यापीठाची स्थापन करण्याचे मात्र राहून गेले आहे. ही उणीव तत्काळ दूर करण्यात यावी व महाराष्ट्रात मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे. हे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मराठी भाषा विद्यापीठ कायदा तयार केला जावा व त्या कायद्यानुसार सदर विद्यापीठ अस्तित्वात यावे.

मराठी भाषेचे अभ्यासक्रम जसे या विद्यापीठात असतील तसेच मराठी भाषकांसाठी रोजगारनिर्मिती करू शकतील, असे अभ्यासक्रमही या विद्यापीठात असतील.

हे विद्यापीठ महाराष्ट्रातील इतर अकृषी विद्यापीठांशी समकक्ष असावे व महामहीम राज्यपालांच्या अखत्यारित असावे. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र भारत आणि भारताबाहेरही असावे. या विद्यापीठाचे स्वरूप 'परिसर विद्यापीठ' (कॅम्पस युनिव्हर्सिटी) असे असावे.

या विद्यापीठाची उभारणी किमान ५०० एकर जागेवर केली जावी.

या विद्यापीठाचा प्रशासकीय व इतर कारभार (वर्जित प्रयोजने वगळता) मराठी भाषेत व देवनागरी लिपीत असावा. विद्यापीठाच्या स्थापनेपासून या आराखड्यात पुढे निर्देशिलेली सर्व संकुले अस्तित्वात यावीत. प्रस्तुत आराखडा पहिल्या पाच वर्षांसाठी आहे. गरजेप्रमाणे आणि तज्ज्ञांच्या सूचनांनुसार यामध्ये कालानुरूप भर घातली जाऊ शकेल.

**मराठी भाषा विद्यापीठातून पुढील कामकाज होईल :**

अ) शैक्षणिक । ब) सामाजिक । क) सांस्कृतिक । ड) अन्य

**अ) शैक्षणिक :**

१. विद्यमान विद्यापीठांच्या मराठी विभागांमधून प्राधान्याने मराठी साहित्य व समीक्षा या संबंधीचे

अभ्यासक्रम राबविले जातात. या अभ्यासक्रमांत एकंदर भाषिक अभ्यासास व विशेषत: मराठी भाषेच्या सखोल अभ्यासास नाममात्र स्थान देण्यात येते. त्यामुळे मराठी भाषेच्या अभ्यासाची विविध क्षेत्रे अजूनही अभ्यासक्रमाबाहेरच राहिली आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन स्वतंत्र मराठी विद्यापीठात मराठी भाषेचा समग्र पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासक्रम तयार केला जाईल. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या अभ्यासकास एम. ए. (मराठी भाषा) अशी पदवी मिळेल. याशिवाय पदवी, पदविका व प्रमाणपत्र देणारे अभ्यासक्रम या विद्यापीठात असतील.

२. आज जगभर उपयोजित भाषाभ्यासाचे महत्त्व अतिशय वाढलेले आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रांत भाषेचा उपयोग करावयाचा असेल तर भाषेच्या उपयोजनासंबंधी कुठल्याही देशाला जागृत राहावे लागते. उपयोजित मराठी भाषेच्या संदर्भात विचार करणारी कुठलीही यंत्रणा सध्या अस्तित्वात नाही. त्यामुळे या स्वतंत्र विद्यापीठातून उपयोजित मराठी भाषेसंबंधीचे अभ्यासक्रम तयार करून ते राबवले जातील.

३. मराठी विद्यापीठामार्फत देशस्तरीय व राज्यस्तरीय शासन संस्था, उद्योगधंद्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या संस्था, संशोधनाला वाहून घेतलेल्या संस्था, तसेच संशोधक आणि पर्यटक, अभ्यासक, मग ते परदेशीय असो किंवा परप्रांतीय, या सर्वांना मराठी भाषेच्या अध्ययनाची संधी व सोय उपलब्ध करून देण्याचे कार्य या विद्यापीठामार्फत केले जाईल. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एका अध्ययनकेंद्राची निर्मिती विद्यापीठामार्फत केली जाईल.

४. मराठी भाषेच्या अध्यापनासाठी आंतरजाल (इंटरनेट) व नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून घेण्यात येईल.

५. सर्व भारतीय भाषांमध्ये आणि जगातील महत्त्वाच्या भाषांमधून मराठी भाषेतील गुणवत्तापूर्ण साहित्य अनुवादित करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा प्रस्थापित केली जाईल.

६. अनुवाद कौशल्य विकसित करणाऱ्या अभ्यासक्रमांची आखणी करून ते राबविले जातील.

७. मराठी शब्दांच्या आणि भाषेच्या प्रमाणीकरणाची कुठलीही यंत्रणा आज महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात नाही. अशा प्रकारची भाषेच्या प्रमाणीकरणाची यंत्रणा या विद्यापीठात निर्माण केली जाईल.

८. या विद्यापीठामार्फत मराठीच्या सर्व बोलींचा ऐतिहासिक, वर्णनात्मक, समाज भाषा विज्ञान-सापेक्ष अशा अभ्यासाची सोय केली जाईल.

९. ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषा विकसित करण्याचे महत्त्वाचे काम हे विद्यापीठ करील. जगभर अस्तित्वात असणारे ज्ञान मराठी भाषेमध्ये यावे यासाठी मराठी भाषेला सक्षम करण्याचे काम या विद्यापीठामार्फत होईल. त्यासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे कोश व अन्य साधने या विद्यापीठामार्फत निर्माण केले जातील.

१०. आरोग्य, कृषी, पर्यावरण, शिल्प, चित्र यांसारख्या बाबींचे ज्ञान पारंपरिक व मौखिक परंपरेने अस्तित्वात आहे. या ज्ञानाचे संकलन व जतन केल्याने मराठी भाषेला ज्ञान-भाषेची प्रतिष्ठा लाभू

शकते. या दृष्टीने हे पारंपरिक ज्ञानही ग्रंथबद्ध केले जाईल. तसेच त्या त्या क्षेत्रातील पारिभाषिक शब्दांचा वापर इतरत्रही करता येऊ शकेल, या दृष्टीने हे मौलिक असलेले काम केले जाईल.

११. मराठी भाषेच्या अभ्यासासाठी आणि समृद्धीसाठी अद्ययावत भाषा प्रयोगशाळा निर्माण केली जाईल.

१२. मराठी भाषेचे ऐतिहासिक व वर्णनात्मक व्याकरण सिद्ध केले जाईल.

१३. मराठी भाषेच्या भाषिक परिवर्तनाचा इतिहास (कालिक व सामाजिक) सिद्ध केला जाईल.

**ब) सामाजिक**

१. सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांना उपयोगी होईल अशी भाषेची विविध रूपे (दृक्श्राव्य) विकसित केली जातील.

२. महाराष्ट्रात विविध जाती-जमातींच्या विविध बोली अस्तित्वात आहेत. परंतु या बोलींचा अभ्यास कुठेही केला जात नाही. या बोलींचा अभ्यास, संकलन व संशोधन येथे केले जाईल.

३. महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक बोली व जाती-जमातींच्या बोली यांच्यामधील शब्दसंपत्तीचे संकलन करून विविध कोश निर्माण करण्याची यंत्रणाही उभी केली जाईल.

४. ऐतिहासिक काळापासून महाराष्ट्रीय लोक कर्नाटक, आंध्र प्रदेश, पंजाब, हरियाना, आसाम, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश यांसारख्या भारताच्या विविध भागात स्थलांतरित व स्थायिक झालेले आहेत. विशेष म्हणजे ते आजही मराठी बोलतात. त्यांच्या मराठी भाषेचे स्वरूप काहीसे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. अशा मराठी लोकांशी संबंध व सलोखा प्रस्थापित करून तेथील मराठी भाषेचा अभ्यास या विद्यापीठात केला जाईल.

५. महाराष्ट्राच्या सीमावर्ती भाषांपैकी कन्नड, तेलुगू, तमिळ आणि गुजराती या भाषांचे प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम सुरू केले जातील व त्यातून आदानप्रदान सुरू होऊ शकेल. तसेच बंगाली, आसामी, उडिया यांसारख्या भारतीय भाषांचे आदानप्रदान होऊ शकेल अशी यंत्रणा निर्माण केली जाईल. भारतातल्या सर्व भाषा-भगिनींमध्ये आंतरसंबंध निर्माण करण्यासाठी आवश्यक त्या योजना आखल्या जातील. या सर्व प्रयत्नांमधून राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार होईल.

६. मराठी भाषेच्या विकासासाठी आवश्यक असणारे सर्व उपक्रम (उदा. मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव, संशोधनपर उपक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा इत्यादी) राबविले जातील.

७. प्राचीन काळापासून महाराष्ट्राच्या समृद्धीत भर घालणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींचा चरित्रकोश तयार करण्यात येईल.

क) सांस्कृतिक :

१. वेगवेगळ्या प्रकारच्या प्रयोगरूप लोककलांमधून भाषा आणि संस्कृतीचे जतन केले जाते. त्या दृष्टीने या कलांचे दस्तऐवजीकरण (लोककलांचा इतिहास, भौगोलिकता आणि लोककलांचे नाते, लोककलांच्या संहिता, सादरीकरणाच्या पद्धती, कलावंतांची चरित्रात्मक सूची, लोकवाद्यांची तसेच प्रयोगपूरक सामग्रीची माहितीपर सूची, इत्यादींचे) दृक्‌श्राव्य माध्यमातून केले जाईल.

२. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील लोकसाहित्याचे संकलन, संशोधन, संपादन व प्रकाशन केले जाईल.

३. महाराष्ट्राच्या विविध भागात प्राचीन काळातील हस्तलिखिते मिळतात. अशा हस्तलिखितांचे संकलन, संशोधन व प्रकाशन करण्यात येईल.

४. भाषेच्या अनुषंगाने प्राप्त होणारे शिलालेख, ताम्रपट, नाणी, भूर्जपत्रे इत्यादी साधनसामग्री संकलित व संग्रहित केली जाईल व त्यांचे संशोधन केले जाईल.
जे शिलालेख, ताम्रपट संग्रहित करता येणार नाहीत, त्यांच्या छायाप्रती या संग्रहालयात ठेवण्यात येतील. तसेच ज्या ठिकाणी जे शिलालेख असतील त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने पुरातत्त्व विभागाच्या सहकार्याने आवश्यक ते प्रयत्न केले जातील. अशा सर्व सामग्रीचे एक स्वतंत्र संग्रहालय निर्माण केले जाईल. त्यात लोककलेशी संबंधित सामग्रीचाही समावेश असेल.

५. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात ग्रामसंस्कृतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे ग्रामजीवनाचा समग्र अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र ग्राम-चरित्रकोशांची निर्मिती करणे, हेही या विद्यापीठाचे काम असेल.

ड) अन्य :

१. वर निर्देशित केलेल्या बाबींशिवाय मराठी भाषेसंबंधी वेळोवेळी जे जे प्रश्न उपस्थित होतील त्यासंबंधीचा अभ्यास व मतप्रतिपादन या विद्यापीठामार्फत केले जाईल.

**मराठी भाषा विद्यापीठाची रचनापद्धती पुढीलप्रमाणे असेल :**

**अ) प्रशासकीय यंत्रणा :**

**१. कुलगुरू** - 'मराठी भाषा विद्यापीठ कायद्या'न्वये महामहीम राज्यपालांच्याद्वारे नियुक्त केलेले.

**२. अधिकारीवर्ग** : कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी, परीक्षा नियंत्रक, शिक्षण व विस्तार अधिकारी. (ही सर्व पदे समकक्ष असतील)

३. प्रारंभी चार उप-कुलसचिव व सहा साहाय्यक कुलसचिव.

४. प्रारंभी अधीक्षक ५, लिपिक ५०, लघुलेखक ५ (१ इंग्रजी व ४ मराठी), मदतनीस १५, सेवकवर्ग २५ नेमले जातील.

५. प्रशासकीय यंत्रणेमध्ये या विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज प्रारंभापासून संगणकाच्या आधारे व्हावे, यासाठी आवश्यक असणारे संगणक तज्ज्ञ आणि त्यांच्याकरिता साहाय्यकारी कर्मचारीवर्ग नियुक्त करण्यात यावा. त्यामध्ये कॉम्प्युटर ॲनॅलिस्ट १ पद, संगणक कार्यप्रणाली (कॉम्प्युटर प्रोग्रामर) १ पद, ही दोन पदे उप-कुलसचिव या दर्जाची असावीत. तसेच संगणक साहाय्यकाची (संगणक विषयातील पदवीधर) ५ पदे निर्माण केली जावीत.
६. चार स्वीय साहाय्यक, एक जनसंपर्क अधिकारी.
७. सुरक्षा अधिकारी १, बागकाम निरीक्षक १, स्वच्छता निरीक्षक १ अशी पदे असतील. सुरक्षा व्यवस्था, बागकाम व्यवस्था, स्वच्छता इ. कामे कंत्राटपद्धतीने करून घेण्यात येतील.
८. याशिवाय आवश्यकतेप्रमाणे अधिकची पदे निर्माण केली जातील.

**ब) शैक्षणिक :**

विद्यापीठ स्थापनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शैक्षणिक विभागाची रचना पुढीलप्रमाणे संकुल पद्धतीची (स्कूल सिस्टीम) असेल :

१. मराठी भाषाभ्यास संकुल
२. कला आणि संस्कृती अभ्यास संकुल
३. अनुवाद अभ्यास संकुल
४. उपयोजित भाषाभ्यास संकुल
५. ज्ञानभाषानिर्मिती संकुल
६. भाषा प्रमाणीकरण संकुल
७. विस्तार सेवासंकुल
८. संशोधन आणि प्रशिक्षण संकुल
९. महिती-तंत्रज्ञान अभ्यास संकुल
१०. दूरशिक्षण संकुल
११. तौलनिक भाषाभ्यास संकुल

वेळोवेळी विद्यापीठाला आवश्यक वाटतील अशी संकुले निर्माण केली जातील. उपरोक्त सर्व संकुले ही या विद्यापीठाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व अन्य बाबींच्या पूर्ततेसाठी कार्य करतील. मराठी भाषाभ्यास संकुलात मोडी लिपीचा अभ्यास होणेही अपेक्षित आहे.

वरील प्रत्येक संकुलात प्रारंभी एक प्राध्यापक, एक सहयोगी प्राध्यापक, एक साहाय्यक प्राध्यापक आणि एक संशोधन साहाय्यक अशी पदे असतील. याशिवाय एक लिपिक आणि एक सेवक असतील.

शैक्षणिक संकुलासाठी एकूण पदसंख्या पुढीलप्रमाणे असेल व या पदांची शैक्षणिक आर्हता संकुलाचे स्वरूप व कार्यप्रणाली यांना अनुसरून असेल.

१. प्राध्यापक - ११, २. सहयोगी प्राध्यापक - ११, ३. साहाय्यक प्राध्यापक - ११, ४. संशोधन साहाय्यक - ११, ५. लिपिक - ११, ६. सेवक - ११

**क) अन्य विभाग :**

हे विद्यापीठ अधिक कार्यक्षम पद्धतीने चालण्याच्या दृष्टीने सुसज्ज ग्रंथालय, पोथीशाळा व संग्रहालय आणि भाषाप्रयोगशाळा या गोष्टी अत्यावश्यक ठरणार आहेत, त्या दृष्टीने पुढील पदांवर नेमणुका केल्या जातील.

**१. ग्रंथालय :**

ग्रंथपाल - १, साहाय्यक ग्रंथपाल - २, लिपिक - २, प्रारंभी ग्रंथालय साहाय्यक - १०, सेवक - ५

**२. पोथीशाळा व संग्रहालय :**

वस्तुसंग्रहालय प्रमुख/अभिरक्षक - १, साहाय्यक वस्तुसंग्रहालय/अभिरक्षक - २, लिपिक - २, साहाय्यक - १०, तंत्रज्ञ - २, सेवक - १.

**३. भाषा प्रयोगशाळा -**

साहाय्यक प्राध्यापक - २, प्रयोगशाळा तंत्रज्ञ - २, लिपिक - १, सेवक - १.

**ड) विद्यापीठाची केंद्रे व कर्मचारीवर्ग :**

विद्यापीठाची जिल्हावार केंद्रे असावीत असे प्रस्तावित केलेले आहे. त्यासाठी लागणारा कर्मचारीवर्ग विद्यापीठ स्थापनेनंतर निर्माण केला जाईल.

वर प्रस्तावित केलेल्या स्वतंत्र मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना तातडीने करण्यात यावी.

**४.१.४.न्यायालयातील कामकाजात मराठीचा वापर :**

१. दि. २२ ऑगस्ट १९९५ रोजी महाराष्ट्र शासनाने आदेश काढून सर्व नियम, विनियम आणि उपविधी, आदेश हे मराठीमध्येच असले पाहिजेत, असे सांगितले आहे. तरीदेखील सध्या विधिमंडळात सादर होणाऱ्या सर्व कायदेविषयक गोष्टी प्रथमत: इंग्रजी भाषेमध्ये सादर केल्या जातात व त्याचा अनुवाद मराठी भाषेत केला जातो. असे न होता येत्या तीन वर्षांत उपरोक्त सर्व बाबी प्रथमत: मराठी भाषेमधूनच सादर केल्या जाव्यात.

२. शासकीय आदेशाप्रमाणे जिल्हा स्तरांपर्यंतचे न्यायालयीन कामकाज मराठीमध्ये होईल, असा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने आवश्यक ती परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. तरीही तालुका व जिल्हा स्तरांवरील न्यायालयांमधून मराठी भाषेत निकालपत्रे देण्याचे

प्रमाण सध्या साधारणत: ४० टक्क्यांपर्यंत आहे. हे प्रमाण येत्या तीन वर्षांत शंभर टक्के व्हावे, अशी शिफारस करण्यात येत आहे.

३. तालुका व जिल्हा स्तरावरील न्यायालयांत मराठी भाषेचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने न्यायाधीशांना तसेच कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे व ते देण्यात यावे. भारत सरकारचे सर्व कायदे तसेच विविध न्यायालयांमधील महत्त्वाचे खटले (केस लॉ) यांचा अनुवाद मराठीमध्ये करून घेतला जावा. हे काम येत्या पाच वर्षांत पूर्ण व्हावे.

४. मराठी भाषेत केलेली कायद्याची संहिता ही न्यायालयात प्रमाण संहिता म्हणून स्वीकारली जावी.

५. उच्च न्यायालयाची भाषा ही इंग्रजी असावी, अशी भारतीय राज्यघटनेतील तरतूद आहे. याचा अर्थ अन्य भारतीय भाषांचा वापर तेथे करू नये, असा होत नाही. म्हणून उच्च न्यायालयामध्ये सुद्धा मराठी भाषेचा वापर करता येऊ शकतो. तेव्हा उच्च न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर व्हावा, यासाठी प्रयत्न करावेत.

६. 'बॉम्बे हायकोर्ट'चे नामकरण 'महाराष्ट्र व गोवा उच्च न्यायालय' असे करण्यात यावे.

**४.१.५. प्रशासन :**

१. सर्व शासकीय कार्यालयांपासून ते मंत्रालयापर्यंतचा सर्व पत्रव्यवहार, शासकीय टिपण्या व त्यावरील आदेश निरपवादपणे मराठी भाषेतच लिहिले जावेत. कक्ष अधिकारी ते मुख्य सचिवांपर्यंतच्या सर्व अधिकाऱ्यांनी संबंधित विषयांवरील चर्चाही मराठी भाषेतच कराव्यात व नव्याने आदेश द्यावयाचे असल्यास ते सर्व पातळ्यांवर मराठी भाषेतूनच दिले जावेत. (महाराष्ट्र शासनाने यासंबंधीचे विविध आदेश निर्गमित केलेले आहेत. तथापि, याकडे दुर्लक्ष होताना दिसून येते.)

२. शासकीय पातळीवर वापरल्या जाणाऱ्या मराठी पारिभाषिक शब्दांचे सुलभीकरण करण्याची गरज लक्षात घेऊन येत्या तीन वर्षांत हे सुलभीकरण केले जावे.

३. परभाषेतून प्रशासकीय मराठी भाषेत रूळलेल्या शब्दांचे प्रमाणीकरण करण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून तीन वर्षांच्या आत त्याचा कोश प्रसिद्ध केला जावा.

४. प्रशासनाचे सर्व व्यवहार काटेकोरपणे मराठी भाषेत केले जावेत यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी आदेश काढलेले आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी अनेक ठिकाणी होताना दिसत नाही. त्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा निर्माण केली जावी.

५. अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना तो/ती आपापल्या कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर किती प्रमाणात करतो / करते याची काटेकोर नोंद करून त्यास/तिस (अधिकाऱ्यास व कर्मचाऱ्यास) पदोन्नतीमध्ये प्राधान्य देण्यात यावे. प्रसंगी अशा कर्मचाऱ्यास विशेष वेतनवाढ देण्याचे धोरणही अवलंबण्यात यावे. या धोरणाची अंमलबजावणी तत्काळ सुरू व्हावी.

६. विद्यापीठे, इतर अशासकीय संस्था, निमशासकीय संस्था यामधील कारभार येत्या तीन वर्षांत संपूर्णत: मराठी भाषेमध्ये केला जावा.

७. पोलीस यंत्रणेचा मोठ्याप्रमाणात जनसामान्यांशी संबंध येतो, हे लक्षात घेऊन पोलीस खात्यातील सर्व प्रकारचे कायदे, नियम व सर्व प्रकारचे पत्रव्यवहार मराठी भाषेत केले जावेत. अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या दरम्यान शिकवले जाणारे कायदे, संकेत स्थळे, आज्ञावली (सॉफ्टवेअर), परिपत्रके अशा सर्व गोष्टी मराठी भाषेत असाव्यात. अनेकदा सनदी अधिकाऱ्यांचा कल मराठी भाषेतून कामकाज न करण्याकडे असतो. परिणामकारकपणे मराठी भाषेतून कामकाज करता येण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जावी व मराठी भाषेत कामकाज करणे बंधनकारक केले जावे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने काही परिपत्रके काढलेली आहेत.

८. शासकीय व निमशासकीय कार्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था इत्यादी ठिकाणी काम करणाऱ्या सर्व पातळीवरील कर्मचाऱ्यांची हजेरीपत्रके, सेवापुस्तके, गोपनीय अहवालाची प्रपत्रे, मराठी भाषेत असावीत. तसेच जो अहवाल लिहिला जाईल तोही मराठी भाषेतून लिहिला जावा.

९. मराठी भाषेचा अधिकाधिक वापर होण्यासाठी प्रशासनामध्ये संगणकाचा पूर्णपणे वापर केला जावा. संगणकाच्या आज्ञावलीपासून अद्ययावत तंत्रज्ञानापर्यंत सर्व बाबी मराठी भाषेत उपलब्ध करून देण्यात याव्यात.

१०. कर्मचाऱ्यांपासून ते भारतीय प्रशासन सेवेतील सनदी अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येक जण मराठी भाषेचा वापर करतो किंवा नाही याची नोंद त्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात तसेच सेवापुस्तिकेत केली जावी.

११. शासकीय व शासनप्रणित विभाग, संस्था, उपक्रम, महामंडळे, योजना, अधिनियम व अध्यादेश यांची नावे केवळ मराठी भाषेत असावीत. विशेषनामांचे इंग्रजी भाषांतरित रूपे मूळात उपलब्ध करून देऊ नयेत आणि राजपत्रात अधिनियम, अध्यादेश आणि विधेयके तसेच राजपत्रात प्रसिद्ध करावयाच्या सर्व बाबींमध्ये उपरोक्त नावे आणि विशेषनामे पदनामे इत्यादींचे केवळ मराठी रूप प्रसिद्ध करावे. आवश्यकतेनुसार त्यांचे केवळ रोमन लिपीत लिप्यंतर करावेत. पण अन्य भाषेत भाषांतर नसावे. उदा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याचे लिप्यंतर रोमन लिपीत 'Maharashtra Audhyogik Vikas Mahamandal' अशा प्रकारे राजपत्रात नोंद असावी.

### ४.१.६. वित्त संस्था :

१. महाराष्ट्रातील राष्ट्रीयीकृत व आंतरराज्यीय अधिकोषांचे (बँकांचे) व वित्त संस्थांचे सर्व कारभार मराठी भाषेमधून केले जावेत यासाठी त्वरित आदेश निर्गमित केले जावेत.

२. मराठी भाषेमध्ये व्यवहार केल्यास अधिकोष (बँका) असा व्यवहार नाकारतात, कुठल्याही प्रकारची सबब सांगून अधिकोषांना (बँकेला) तसे करता येणार नाही किंवा कुठल्या प्रकारचे दंड

आकारता येणार नाहीत, याची काळजी शासनाच्या वतीने घेण्यात यावी.

३. अधिकोषांचे (बँकेचे) व वित्त संस्थांचे व्यवहार मराठी भाषेमध्ये होतात किंवा नाही हे पाहण्यासाठी अधिकोषांच्या (बँकेच्या) प्रत्येक शाखेत मराठी भाषा अधिकाऱ्याची नेमणूक दोन वर्षांच्या कालावधीत करण्यात यावी.

४. महाराष्ट्रात काम करणाऱ्या अधिकोषांमधील (बँकांमधील) व वित्त संस्थांमधील सर्व प्रकारचे अर्ज व माहिती-पत्रके मराठी भाषेत देणे बंधनकारक करण्यात यावे. तसेच गृहपत्रिका, वार्षिक अहवाल, लेखा-परीक्षणे व इतर कागदपत्रे मराठी भाषेत प्रकाशित करणे बंधनकारक केले जावे.

५. अधिकोष (बँका), वित्त संस्था व इतर कार्यालयांमधून २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करणे बंधनकारक करण्यात यावे.

६. अधिकोष (बँका), वित्त संस्था व इतर आर्थिक व्यवहार करणाऱ्या सर्व संस्थांना अंक रोमन लिपीत लिहिण्याऐवजी मराठी अंकलिपीत लिहिणे बंधनकारक केले जावे.

७. समभाग भांडवली बाजारातील (शेअर मार्केट) सर्व वित्त संस्थांचे व उद्योगांचे व्यवहार म्हणजे सर्व माहिती-पत्रके, अर्ज, परिपत्रके, प्रपत्रे इत्यादी बाबींसाठी मराठी भाषेचा वापर अनिवार्य केला जावा.

८. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमधील कामकाज मराठी भाषेत करणे बंधनकारक केले जावे.

९. शासन व शासनप्रणित उपक्रम/संस्था, विभाग यांची आर्थिक व्यवहार करणारी खाती ज्या अधिकोषात (बँकेत) असतील त्या अधिकोषांना मराठी भाषेत व्यवहार करणे बंधनकारक केले जावेत. तसेच अधिकोषांमधील (बँकांमधील) खातेदारांनी खातेधारक या नात्याने तेथील अधिकाऱ्यांकडून खात्यासंबंधीचे सर्व व्यवहार मराठी भाषेतून करून मागावेत. उदा. पैसे भरणे/ काढणे, चिठ्ठी, धनादेश, धनाकर्ष, मुदत ठेव पावत्यांवरील लेखन, खातेउतारा इत्यादी. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बी. सी. रूल डीबीओडी नं. एलईजी-बीसी-७५/०९-०७-००५/२००८-०९, दि. ३.११.२००८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मराठी भाषेत मागावीत.

**४.१.७. उद्योगजगत :**

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील (आय. टी. आय.) परीक्षा देताना विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या प्रश्नपत्रिका या हिंदी व इंग्रजी भाषेत असतात त्या मराठी भाषेतही उपलब्ध करून दिल्या जाव्यात. त्यासाठी भारत सरकारच्या संबंधित विभागाशी त्वरित संपर्क साधून एक वर्षाच्या आत मराठी भाषेतून प्रश्नपत्रिका दिल्या जाव्यात.

२. औद्योगिक जगतात मराठी कामगार विपुल प्रमाणात असतात याची दखल घेऊन तेथील सर्व (प्रशिक्षण, पत्रव्यवहार, गृहपत्रिका, सूचना फलकावरील मजकूर, कर्मचाऱ्यांचा वार्षिक अहवाल, हजेरी पत्रके, इत्यादी) व्यवहार मराठी भाषेतूनच केले जावेत.

३. मोठ्या औद्योगिक संस्थांमध्ये मराठी भाषेतून व्यवहार करण्यासाठी मराठी अधिकाऱ्याची नेमणूक करणे अनिवार्य केले जावे.

४. नवीन औद्योगिक कारखान्यांना परवानगी देताना तेथील उपरोक्त सर्व व्यवहार मराठी भाषेत करण्याची अट घातली जावी.

५. या बाबींची पूर्तता होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी उद्योग निरीक्षकाकडे सोपविण्यात यावी.

६. मराठी भाषेचा सर्वोत्कृष्ट वापर करणाऱ्या औद्योगिक संस्था/कारखाना यांना शासनाच्या वतीने दरवर्षी पुरस्कार दिला जावा.

७. मोठ्या आंतरराष्ट्रीय औद्योगिक संस्थांमध्ये नोकरभरती करताना किमान ५० टक्के मराठी भाषकांची नेमणूक करण्यात यावी. जे अ-मराठी सेवक असतील त्यांना मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान नोकरीस लागल्यापासून तीन वर्षांच्या आत प्राप्त झाले असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असावे. असे प्रमाणपत्र मराठी परीक्षा घेणाऱ्या शासनमान्य संस्थांकडून किंवा भाषा संचालनालयाकडून घ्यावे. त्याचप्रमाणे विद्यापीठाने असे अभ्यासक्रम सुरू केल्यास विद्यापीठाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे.

८. औषधी उत्पादने, सौंदर्य प्रसाधने, अन्न उद्योग, कृषी-उद्योग, सेवाक्षेत्रांसह सर्व औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादनावरील वेष्टने, सोबतची माहिती-पत्रके, हमीपत्रे (वॉरंटी/गॅरंटी) इत्यादी सर्व कागदपत्रे मराठी भाषेत देणे बंधनकारक केले जावे. जीवरक्षक औषध सामग्रीसाठी मराठी भाषेचा वापर एका वर्षाच्या आत सुरू केला जावा.

९. उद्योगांकडून माध्यमांना दिल्या जाणाऱ्या जाहिरातींमध्ये (उत्पादनाच्या, नोकर भरतीच्या, टाकाऊ मालाच्या विक्रीबाबतच्या इ. ) मराठी भाषेचा वापर अनिवार्य असावा.

१०. गृहनिर्माण हा मोठा उद्योग झालेला आहे. तेथील सर्व व्यवहार (गृहनिर्माण संस्थेवरील नामनिर्देशक फलक, ताबापत्रे, जाहिरात, करारपत्र, सदनिकांवरील नामफलक, इत्यादी) एक वर्षाच्या आत मराठी भाषेत करण्याचे बंधन घातले जावे.

११. गृहनिर्माण संस्थांचे वार्षिक अहवाल, समभाग प्रमाणपत्रे, सेवाशुल्क पावत्या व इतर सर्व व्यवहार मराठी भाषेत करणे बंधनकारक व्हावे.

१२. धर्मादाय आयुक्त, सहकार निबंधक, औद्योगिक न्यायालय, ग्राहक मंच, इत्यादी सर्वसामान्य लोकांशी संबंधित असलेल्या कार्यालयांतील सर्व व्यवहार येत्या तीन वर्षांत मराठी भाषेतून करणे बंधनकारक केले जावे.

१३. परिवहन क्षेत्रातील (सरकार व खाजगी) सर्व व्यवहार (वाहनांवरील पाट्या, पत्रव्यवहार, परवाना, थांब्यांवरील माहिती, तिकिटांचे आरक्षण इत्यादी) येत्या तीन वर्षांत मराठी भाषेत करणे बंधनकारक केले जावे.

१४. पथकर (टोल) नाक्यांवरील सर्व माहिती, सूचना, पावत्या व नामफलक इत्यादी बाबी एक वर्षाच्या आत मराठी भाषेत करणे बंधनकारक केले जावे.

१५. सर्व प्रकारच्या रुग्णालयांमधील प्रशासकीय व्यवहार व इतर व्यवहार मराठी भाषेत असणे बंधनकारक केले जावे.

१६. महाराष्ट्रामध्ये असणारी सर्व प्रकारची उपाहारगृहे, विश्रांतीगृहे (हॉटेल्स), दुकाने इत्यादी ठिकाणचे नामफलक, दरपत्रके, पावत्या इत्यादी सर्व व्यवहार येत्या दोन वर्षांच्या आत मराठी भाषेत करणे बंधनकारक केले जावे.

१७. महानगरपालिका, नगरपालिका यांना आपल्या कार्यक्षेत्रात उपरोक्त सर्व बाबीत मराठी भाषेचा वापर होतो की नाही, हे काटेकोरपणे पाहणे बंधनकारक असावे. संबंधित अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी सोपविण्यात यावी. ही जबाबदारी टाळणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

१८. चित्रनगरीसारख्या संस्थांमध्ये चित्रपट उद्योगाला पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अशा सुविधा घेणाऱ्या चित्रपट निर्मात्यांनी आपल्या चित्रपटात सर्व पातळ्यांवर म्हणजे कलावंत, तंत्रज्ञ व इतर कर्मचारी यामध्ये किमान ३० टक्के मराठी भाषकांचा समावेश करणे बंधनकारक करावे.

महाराष्ट्रामधील चित्रपटगृहांमध्ये जे चित्रपट प्रदर्शित केले जातात त्या चित्रपटांत तंत्रज्ञ, कलावंत व इतर अन्य घटकांमध्ये ३० टक्के मराठी भाषक असल्याची खातरजमा केली जावी आणि या अटींची पूर्तता केलेली नसेल तर त्यांना राज्य शासनाची कोणत्याही प्रकारची कर सवलत दिली जाऊ नये.

केंद्रीय परिनिरीक्षण मंडळामध्ये (सेन्सॉर बोर्ड) मराठी भाषक तज्ज्ञांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले जावे, यासाठी केंद्र शासनाकडे आग्रह धरण्यात यावा.

### ४.१.८. प्रसारमाध्यमे :

१. वृत्तपत्रे व नियतकालिके हे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचणारे व जनमत प्रभावित करणारे सर्वात महत्त्वाचे प्रसारमाध्यम आहे. त्याची व्याप्ती लक्षात घेता, त्या माध्यमांत वापरली जाणारी मराठी भाषा बिनचूक असावी, यावर कटाक्ष राहील. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या वतीने जिल्हा माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी. तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांच्या वतीने जाहिराती देताना त्या त्या वृत्तपत्राचा/नियतकालिकाचा भाषिक दर्जा विचारात घेतला जावा.

२. भाषा आणि संस्कृती यांचे अतूट नाते लक्षात घेऊन आकाशवाणी आणि दूरचित्रवाहिन्यांवरून मराठी भाषेची आणि संस्कृतीची महती सांगणारे व संवर्धन करणारे कार्यक्रम सादर व्हावेत, या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत.

३) मराठी दूरचित्रवाहिन्यांवरून प्रसारित होणारी मराठी भाषा अनेकदा अत्यंत सदोष असते. तसेच तेथे केलेले नामांकन आणि आरेखन हेही सदोष असते. त्याचा कोट्यवधी मराठी भाषक प्रेक्षकांवर विपरीत संस्कार होतो. हे टाळण्यासाठी व मराठी भाषेच्या अचूक वापरासाठी या वाहिन्यांना मराठी भाषा अधिकारी नेमण्याची सक्ती केली जावी.

४) राष्ट्रीय वाहिन्यांवरून जे वेगवेगळे कार्यक्रम प्रसारित केले जातात, हे कार्यक्रम जागतिक / प्रादेशिक भाषेतील असले तरी जेव्हा महाराष्ट्रात दाखविले जातील तेव्हा ते मराठी भाषेत (निवेदन, संवाद इ.) असावेत असे बंधन घातले जावे. सध्या बंगाली, कन्नड, तेलुगू, मल्याळम्, तमिळ, हिंदी इत्यादी भाषांचे पर्याय उपलब्ध आहेत. मात्र मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध नसतो. असे कार्यक्रम मराठी भाषेतून प्रसारित व्हावेत, असे बंधन घातले जावे.

५) पुष्कळदा वेगळ्या भाषेतील चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित करीत असताना अन्वयार्थ द्योतक मजूकर (सब टायटल) केवळ इंग्रजी भाषेमध्ये दर्शविला जातो. महाराष्ट्रात चित्रपट अगर दुसरा कार्यक्रम दाखवावयाचा असल्यास अन्वयार्थ द्योतक मजकूर मराठी भाषेत देणे बंधनकारक करण्यात यावे.

### ४.१.९. नव तंत्रज्ञान आणि मराठीचा वापर :

१. मराठी भाषेचा प्रसार जगभर होण्यासाठी मराठी माणसाला नव्या तंत्रज्ञानाचा पूर्ण परिचय करून देणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने संगणकाची व महाजालाची (इंटरनेट) माहिती त्याला असणे आवश्यक आहे. परंतु संगणकाचा वापर करीत असताना संगणकाच्या पडद्यावर सर्व सूचना इंग्रजी भाषेतून येत असतात. त्या सर्व सूचना मराठी भाषेतून याव्यात म्हणून विशेष मराठी आज्ञावली (सॉफ्टवेअर) वापरात आणण्याकरिता लागणारी यंत्रणा शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात यावी.

२. कोणत्याही प्रकारच्या संगणकीय तंत्रज्ञानाची व साधनसामग्रीची महाराष्ट्रात विक्री करताना त्यासंबंधीची माहिती-पत्रके व वापरासंबंधीची सूचना-पत्रके मराठी भाषेत असणे अनिवार्य केले जावे.

३. आज मराठी भाषेतील संगणक साक्षरतेची नितांत आवश्यकता असून त्या दृष्टीने सरकार प्रयत्नशील आहे. तरीही आज या तंत्रज्ञान उपलब्धीचा वापर व्हावा त्या प्रमाणात केला जात नाही. मराठी भाषा संगणक साक्षरतेचे प्रमाण सातत्याने वाढविण्यासाठी शासनाने प्रयत्नशील राहावे. त्यासाठी ठिकठिकाणी प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा यांचे आयोजन करण्यात यावे. तसेच दूरचित्रवाहिन्यांवरूनदेखील अशा उपक्रमांना चालना देण्यात यावी.

४. मराठी भाषेतील दुर्मिळ आणि साहित्यदृष्ट्या महत्त्वाच्या ग्रंथांचे जतन आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केले जावे.

५. मराठी भाषेतील कोश वाङ्मय, मराठी भाषेसंबंधीचे लेखनविषयक नियम आणि व्याकरण

इत्यादी बाबी संगणकावर उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच अनुवाद प्रक्रियेत साहाय्यभूत होणारे तंत्रज्ञान संगणकामार्फत उपलब्ध करून देण्यात यावे.

६. प्रचलित जीवनव्यवहारात नित्यशः उपयोगी पडणाऱ्या विविध क्षेत्रांशी संबंधित (उद्योग, न्याय, शिक्षण, वित्तसंस्था इ.) इंग्रजी भाषेतील पदावली व वाक्यांश अनुवादित स्वरूपात मराठी भाषेत तयार करून ते सर्वांच्या सोयीसाठी संगणकावर उपलब्ध करून दिले जावेत.

७. जागतिक पातळीवर मराठी भाषेचे महत्त्व आणि अनन्यसाधारणत्व सर्वांच्या मनावर ठसविण्याच्या दृष्टीने मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांची वैशिष्ट्यपूर्णता प्रकट करील अशा प्रकारची आज्ञावली (सॉफ्टवेअर) विकसित करावी व ती प्रसारित करावी.

८. जगातील कोणत्याही भाषकाला मराठी भाषा शिकावयाची असेल तर त्यांच्यासाठी संगणकावर लेखन व उच्चारण शिकविणारी आज्ञावली (सॉफ्टवेअर) उपलब्ध करून देण्यात यावी.

९. महाराष्ट्रात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक संगणकावर मराठी भाषेतील आज्ञावली (सॉफ्टवेअर) असणे बंधनकारक केले जावे.

१०. मराठी भाषेच्या समृद्धीसाठी हवी ती भर घालता यावी यासाठी तशी सोय असणारे मराठी भाषेचे विकसनशील संकेतस्थळ निर्माण करून दिले जावे.

११. आज मोठ्याप्रमाणात भ्रमणध्वनी वापरला जात आहे. या भ्रमणध्वनीतील सर्व व्यवहार मराठी भाषेतून होण्यासाठी प्रयत्न केले जावेत

१२. मराठी माणूस जेव्हा परदेशस्थ व परभाषिक माणसाशी मराठी भाषेत बोलेल तेव्हा त्याचे संभाषण आवश्यकता असल्यास भाषांतरित होऊन त्या त्या भाषकांपर्यंत पोहोचेल, तसेच इतर भाषांमधील संभाषण मराठीत अनुवादित होऊन मराठी माणसापर्यंत पोहोचेल, अशी यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

१३. मराठी भाषा-लेखनातील चुका दुरूस्त करणारी यंत्रणा (स्पेलचेक सिस्टिम) संगणकावर उपलब्ध करून देण्यात यावी.

१४. ज्या कोणाला मराठी भाषा शिकावयाची असेल त्या देशी व परदेशी अशा सर्वांसाठी मराठी भाषा, भाषा विज्ञान, व्याकरण व मराठी साहित्य यांचे संगणकीय अभ्यासक्रम सिद्ध केले जावेत व ते सर्वांना मोफत पुरविण्यात यावेत.

### ४.१.१०. अन्य महत्त्वाच्या बाबी :

१. मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असणारा न्यूनगंड दूर होईल असे प्रेरक वातावरण शासनाने निर्माण करावे. त्यासाठी यथायोग्य कार्यक्रमांचे आयोजन व आवश्यक ती आर्थिक तरतूद शासनाच्या वतीने केली जावी.

२. मराठी भाषा येणाऱ्यांना महाराष्ट्रातील शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये प्राधान्याने सामावून

घेण्याचे धोरण स्वीकारावे.

३. महानगरपालिका, नगरपालिका व इतर शासकीय व निमशासकीय संस्था यांमध्ये नोकर भरती करताना मराठी माणसांना प्राधान्य दिले जावे.

४. मराठी भाषेतून विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिकशास्त्रे आणि साहित्य समीक्षा याविषयी विपुल लिहिले जाते. परंतु त्यांची एकत्रित नोंद करणारी कुठलीही यंत्रणा महाराष्ट्रात अस्तित्वात नाही. हे लक्षात घेऊन अशा प्रकारच्या महत्त्वाच्या लेखनाची नोंद करणारी यंत्रणा (सायटेशन इंडेक्स व इम्पॅक्ट फॅक्टर) कार्यान्वित करण्यात यावी.

५. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या भाषाज्ञानाची गरज भागविण्यासाठी भारतातील सर्व प्रांतिक भाषा आणि जगातील प्रगत राष्ट्रांच्या (इंग्रजी खेरीज) सर्व भाषा अवगत करून देणाऱ्या केंद्रांची निर्मिती महाराष्ट्रात केली जावी.

६. राज्याच्या अर्थसंकल्पात सध्या मराठी भाषा विभागासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात येते. ही तरतूद विद्यमान संस्थांसाठी/उपक्रमांसाठी वापरली जाते. तथापि, मराठी भाषेच्या विकासासाठी व संवर्धनासाठी वेगळी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे. त्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात यावे व त्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला जावा.

७. वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणाचा वाढता वेग लक्षात घेता वाचनसंस्कृती वृद्धीचे ध्येय साकार करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान पाच सुसज्ज (मराठी पुस्तके, ध्वनी चित्रफिती, संगणकीय सुविधा इ. सह) शासकीय ग्रंथालये उभारली जावीत.

८. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि अभिवृद्धीसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक स्वायत्त अशी भाषा अकादमी असावी. ती आपापल्या जिल्ह्याच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन मराठी भाषेच्या अभिवृद्धीचे कार्य करील.

९. अनेक औद्योगिक आणि वित्त संस्था आपल्या जाहिराती केवळ इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करतात. त्यांना महाराष्ट्रात जाहिरात करावयाची असल्यास ती इंग्रजी भाषेबरोबरच मराठी भाषेत करणे अनिवार्य केले जावे.

१०. मराठी भाषेमधील ललित साहित्य व वैचारिक साहित्य अधिक समृद्ध व्हावे यासाठी पाठ्यवृत्ती, प्रवासवृत्ती, गौरववृत्ती इत्यादी अर्थसाहाय्य देणाऱ्या योजना राबविल्या जाव्यात. तसेच योजनाबद्ध लेखन करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना कर्तव्य रजा देण्यात यावी.

११. भारतातील वेगवेगळ्या प्रांतांत मराठीभाषक मोठ्याप्रमाणात राहतात. तसेच तेथे त्यांची सांस्कृतिक व वाङ्मयीन मंडळे आहेत. त्यांच्याशी घनिष्ट संबंध प्रस्थापित केला जावा, तसेच त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी.

१२. मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, उद्योग, वैद्यकीय आणि इतर जीवनोपयोगी क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान, शोध आणि नवकल्पनांची माहिती मराठी भाषेत

कालसुसंगत पद्धतीने तत्काळ आणण्याची यंत्रणा उभारावी.

१३. आपल्याशी आर्थिक व्यवहार होणाऱ्या परकीय देशांच्या राष्ट्रभाषा मराठी भाषेतून थेट शिकण्याची सोय मराठी विद्यापीठाने अगदी जिल्हास्तरावरही उपलब्ध करून दिल्यास मराठी मुलांच्या या देशात जाण्याच्या, नोकरी मिळवण्याच्या संधी वाढतील. या देशांमधील पर्यटकांनाही आपली मुले जवळची वाटतील. त्या देशात मराठी संस्कृतीची माहिती केंद्र उभारणे, प्रदर्शने भरवणे, खास मराठी खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणे व अशा केंद्रात त्या त्या भाषेत बोलणाऱ्या मुलांना नोकऱ्या उपलब्ध करून देणे सोपे होईल/आवश्यक होईल.

अ-शासकीय स्तरावर एखादी संस्था वरील उपक्रम हाती घेत असेल तर त्या संस्थेला शासनाने मदत करावी किंवा प्रोत्साहन द्यावे.

१४. शासकीय व शासनपुरस्कृत अशा सर्व आस्थापनांची नावे मराठी भाषेत करण्यात यावीत. तसेच त्यांची लघुरूपेही मराठी भाषेत केली जावीत. उदा. बेस्ट, सी. एस. सी. इ.

## ४.२. शिफारशींच्या अंमलबजावणीसाठीचा कालबद्ध कार्यक्रम :

जीवनाच्या विविध क्षेत्रात मराठी भाषेचा वापर संपूर्णतः व्हावा यासाठी शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. या शिफारशीचे स्वरूप पाहता त्यांच्या पूर्ततेसाठी कालावधी निश्चित करणे आवश्यक वाटते. तो कालावधी पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेला आहे.

**शिक्षण :**

**शालेय शिक्षण**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १ व २ | त्वरित | सातत्याने प्रत्येक वर्षी |
| ३ | ३ वर्षे | |
| ४ | त्वरित | सातत्याने किमान १० वर्षे |
| ५ | २ वर्षे | अग्रक्रमाने |
| ६ | त्वरित | |
| ७ | त्वरित | सातत्याने |
| ८ | ३ वर्षे | सातत्याने |

| | | |
|---|---|---|
| ९ | १० वर्षे | प्रत्येक वर्षी किमान ३ याप्रमाणे येत्या १० वर्षांत महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये शासननिर्मित विद्यालये सुरू व्हावीत. |
| १० | ३ वर्षे | -- |
| ११ | १० वर्षे | सातत्याने |
| १२, १३ व १४ | त्वरित | -- |

**उच्च माध्यमिक शिक्षण :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | ३ वर्षे | |
| २ | १ वर्षे | |

**उच्च शिक्षण :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | ५ वर्षे | बहुविध ज्ञानशाखांचे शिक्षण मराठी भाषेतून दिल्यास हे ज्ञान जनसामान्यांच्या पर्यंत जाईल व एकूण समाजाचा स्तर उंचावेल व समाजाचा आत्मविश्वासही वाढेल. |
| २ | १ वर्षाच्या आत | किमान २ वर्षात प्रत्यक्ष ग्रंथनिर्मितीचा आरंभ व्हावा व येत्या १५ वर्षांत सर्व ज्ञानशाखांतील पाठ्यपुस्तके मराठी भाषेत निर्माण करण्यात यावीत. |
| ३ | ५ वर्षे | येत्या ५ वर्षांत महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत या शिफारशींची पूर्तता व्हावी. |
| ४ | १० वर्षे | प्रस्तुत अध्यासनांच्या निर्मितीमुळे अपेक्षित असलेले आंतरभारतीचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होऊ शकेल. |
| ५ | त्वरित | |

| | | |
|---|---|---|
| ६<br>७<br>८<br>९ | ६ वर्षे<br>१० वर्षे<br>५ वर्षे<br>निर्णय त्वरित घेण्यात यावा. | सातत्याने<br>सातत्याने<br>सातत्याने<br>विद्यापीठाचा स्वतंत्र कायदा, स्थळ-निश्चिती, भूमिअधिग्रहण इत्यादी बाबी ३ वर्षांत व्हाव्यात. दरम्यानच्या काळात तात्पुरत्या स्वरूपात एखादी इमारत घेऊन विद्यापीठाचा प्रारंभ करता येऊ शकेल. पुढील १५ वर्षांत सर्व भौतिक सुविधांसह हे विद्यापीठ सुरू व्हावे. |

**न्यायालयातील कामकाजात मराठीचा वापर :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १ व २<br>३<br>४<br>५<br><br>६ | ३ वर्षे<br>५ वर्षे<br>त्वरित<br>५ वर्षे<br><br>त्वरित | न्यायालय ही जनसामान्यांशी संबंधित बाब असल्यामुळे सर्व न्यायालयात मराठी भाषेचा वापर वाढवणे आवश्यक आहे. |

**प्रशासन :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १<br>२ आणि ३<br>४<br>५ | त्वरित<br>३ वर्षे<br>त्वरित<br>त्वरित | |

| | | |
|---|---|---|
| ७ | त्वरित | |
| ८ | १ वर्षे | |
| ९ आणि १० | त्वरित | |
| ११ | त्वरित | |

**वित्तीय संस्था :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १ आणि २ | त्वरित | |
| ३ आणि ४ | २ वर्षे | |
| ५ | त्वरित | |
| ६, ७ आणि ८ | २ वर्षे | |
| ९ | १ वर्षे | |

**उद्योगजगत :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १ वर्षे | केंद्र शासनाशी त्वरित संपर्क साधणे आवश्यक राहील. |
| २ | २ वर्षे | |
| ३<br>२ | जास्तीत जास्त<br>३ वर्षे | ३ वर्षांत अंमलबजावणी न झाल्यास पुढील वर्षाच्या आत दंडात्मक कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. |
| ४, ५ आणि ६ | त्वरित | |
| ७ | ३ वर्षे | गरज पडल्यास या कालावधानंतर आस्थापनांच्या अडचणींचे स्वरूप लक्षात घेऊन आणखी ५ वर्षे मुदतवाढ देण्यात यावी. |
| ८, ९, १० व ११ | १ वर्षे | संभाव्य अडचणी लक्षात घेऊन जास्तीत जास्त २ वर्षे मुदत वाढवून देण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| १२ आणि १३ | ३ वर्षे | |
| १४ | त्वरित | |
| १५ आणि १६ | २ वर्षे | |
| १७ | त्वरित | |
| १८ | ५ वर्षे | पूर्वतयारीसाठी जास्तीत जास्त ५ वर्षांचा कालावधी दिला जावा, त्यानंतरच्या पुढील ५ वर्षांत प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात यावी, तथापि कार्यवाही होत नसल्यास पुढील ५ वर्षांत दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. |

**प्रसारमाध्यमे :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १ आणि २ | १ वर्षे | |
| ३, ४ व ५ | २ वर्षे | |

**नवतंत्रज्ञान आणि मराठीचा वापर :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १, २ व ३ | २ वर्षे | १ ते १४ या शिफारशीच्या संदर्भात असे सांगावेसे वाटते की, नवतंत्रज्ञान आणि मराठी भाषेचा वापर या अंतर्गत येणाऱ्या शिफारशींचा संबंध तंत्रसामग्रीशी आणि तंत्रज्ञानाशी आहे. त्यामुळे तज्ज्ञांकडून यासंबंधीचे साहाय्य घेत ही कार्यवाही येत्या १५ ते २० वर्षांत पूर्ण करण्यात यावी. |
| ४, ५, ६, ७ व ८ | ५ वर्षे | |
| ९ | २ वर्षे | |
| १० | त्वरित | |

| | | |
|---|---|---|
| ११ | २ वर्षे | |
| १२, १३ आणि १४ | ३ वर्षे | |

**अन्य महत्त्वाच्या बाबी :**

| शिफारस क्रमांक | सूचित कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|
| १, २ व ३ | त्वरित | सातत्याने |
| ४ | ५ वर्षे | |
| ५ | ५ वर्षे | जगातील महत्त्वाच्या आणि भारताशी व्यापारी संबंध असणाऱ्या भाषांची यादी तयार करून अशी केंद्रे कोठे निर्माण करता येतील याचा आराखडा तयार करावा लागेल. हा आराखडा तयार होऊन अंमलबजावणीसाठी १५ ते २० वर्षांचा काळ लागू शकेल. |
| ६ | १ वर्षे | |
| ७ आणि ८ | १ वर्षात प्रारंभ व्हावा. | येत्या २५ वर्षांत महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये शासकीय ग्रंथालये व भाषा अकादमीची स्वायत्त केंद्रे स्थापन व्हावीत. |
| ९ | त्वरित | |
| १० व ११ | १ वर्षे | येथे सुचविण्यात आलेल्या योजनांमुळे एकूण मराठी भाषेचा दर्जा उंचावण्यासाठी मदत होऊ शकेल. |
| १२ | १५ वर्षे | सातत्याने |
| १३ | त्वरित | सातत्याने |
| १४ | त्वरित | |

■

# म

□

भाग पाच

## । धोरणाच्या अंमलबजावणीविषयीच्या शिफारशी ।

५.१. पूर्वेतिहास

५.२. दंडसंहिता

। धोरणाच्या अंमलबजावणीविषयीच्या शिफारशी ।

**५.१. पूर्वेतिहास :**

भारतीय संविधानामध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या सर्व शासकीय प्रयोजनांकरिता (वर्जित प्रयोजनांचा अपवाद वगळता) मराठी भाषेचा राजभाषा म्हणून वापर करण्याचा निर्णय राज्य विधिमंडळाने घेतला आणि त्यास दि. ११ जानेवारी १९६५ रोजी राज्यपालांची संमती घेऊन हा निर्णय प्रसिद्ध करण्यात आला.

लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सर्वसामान्य जनता या सर्वांची पूर्वापार सवय लक्षात घेऊन मराठी भाषेचा राजभाषा या नात्याने सर्वत्र वापर व्हावा म्हणून सुरुवातीची काही वर्षे शासनाने विनंतीवजा अनेक परिपत्रके काढली.

प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नामफलक, शिक्के, स्वाक्षऱ्या, जाहिरातींचा मजकूर, अहवाल लेखन, अ-मराठी भाषकांसाठी परीक्षा इत्यादींसाठी मराठी भाषेचा वापर कशाप्रकारे करण्यात यावा, यासंबंधीचीही परिपत्रके काढली आहेत (परि.क्र.ओएफएल १०६१/एम, दि. १० जानेवारी १९६१, क्र.मभावा २००८/२५७/प्र.क्र.२५७/०८/२०-ब, दि.१६.४.२००८)

दि. १ ते ३ मार्च १९७८ या काळात नवी दिल्ली येथे केंद्र शासनाने अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचे आयोजन केले होते. या संमेलनात घेतलेल्या निर्णयांप्रमाणे मराठी भाषेचा वापर अधिक प्रमाणात व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने विशेष प्रयत्न सुरू केले.

दि. १० एप्रिल १९९७ रोजी महाराष्ट्र शासनाने १ मे हा 'राजभाषा मराठी दिन' साजरा करण्याच्या संदर्भात शासन निर्णय क्रमांक मभावा १०९६/११६/प्र.क्र.७/२० ब, अन्वये आदेश निर्गमित केला. याच आदेशात सर्व स्तरांवर मराठी भाषेचा वापर वाढावा या दृष्टीने अनेक मार्गदर्शनपर सूचना करण्यात आल्या आहेत. या आदेशात सर्व विद्यापीठांना उच्च शिक्षणाचे माध्यम मराठी करण्याच्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत व त्यासाठी अत्यावश्यक इंग्रजी ग्रंथ मराठीत भाषांतरित

करून विद्यार्थ्यांस उपलब्ध करून द्यावेत, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. याच ठिकाणी हेही नमूद करणे उचित होईल की, १५ नोव्हेंबर २००७ पर्यंत महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेच्या परिणामकारक वापरासंबंधीचे विविध आदेश निर्गमित केलेले आहेत.

तरीही महाराष्ट्र शासनाच्या विविध कार्यालयांमधून तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा वापर ज्या प्रमाणात होणे आवश्यक आहे, त्या प्रमाणात तो होत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता मराठी भाषेचा सार्वत्रिक वापर का होत नाही, त्याची पुढील तीन कारणे सांगता येतील.

१. विविध शासकीय कार्यालयांमधून मराठी भाषेचा वापर होतो किंवा नाही हे पाहण्यासाठी भाषा संचालनालयाला पाहणी करण्याचा अधिकार देणारी परिपत्रके निर्गमित करण्यात आली (क्र. मभावा १०८४/प्र.क्र.२७१/२०, दि. २०.८.१९८४, क्र.मभावा १०८७/१०४७/प्र.क्र.१७२/८७/२०ब, दि. २९ जुलै १९८९ आणि क्र. मभावा १०९४/१३३५/प्र.क्र.५८/९४/२० ब, दि. १८.१.१९९५) त्यांचे अहवालही शासनाला वेळोवेळी सादर झाले. तसेच परिपत्रक क्र. मभावा/प्र.९५/२०, दि. ४.६.१९८५ रोजी शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढविण्यासाठी दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली व या पथकानेही वेळोवेळी अहवाल सादर केले आहेत. पण या अहवालांमधील सूचना, निदर्शनास आणलेल्या त्रुटी यांची दखल घेऊन कार्यवाही करणारा विभाग अस्तित्वात नाही. सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती शासनाने केलेली नाही.
२. शासन निर्णय आणि परिपत्रके यांची अंमलबजावणी न करणाऱ्या विभागाविरुद्ध वा व्यक्तीविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करण्याची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.
३. परिणामी शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय आणि प्रकाशित केलेली परिपत्रके यातून शासनाची मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त व्हावा अशी तीव्र इच्छाशक्ती दिसत असली तरी, ती इच्छाशक्ती फलद्रूप व्हावी अशी कोणतीही तरतूद शासकीय पातळीवर अद्याप तरी झालेली नाही.

वरील परिस्थिती लक्षात घेऊन, मराठी भाषेच्या प्रभावी वापराच्या हेतूने पुढील उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत :

### ५.२. दंडसंहिता :

१. महाराष्ट्र शासनाच्या दक्षता पथकाने अथवा/आणि भाषा संचालनालयाने सादर केलेल्या अहवालाची छाननी करणे, सूचनांचा विचार करणे आणि त्यानुसार कार्यवाही करणे यासाठी सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. हा अधिकारी सचिवाच्या दर्जाचा आणि मराठी भाषेचा जाणकार असावा.
२. प्रभावी प्रशासनासाठी आवश्यक ते मनुष्यबळ संबंधित अधिकाऱ्यास पुरविण्यात यावे.
३. या अधिकाऱ्याने दक्षता पथकाने / पाहणी पथकाने सादर केलेल्या अहवालाची तपासणी करून

त्यावरील परिणामकारक उपाययोजना कराव्यात. या उपाययोजनांचे स्वरूप मराठी भाषेचा वापर न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर ठपका ठेवणे, दोषी ठरविणे, त्याविरुद्ध शासकीय सेवाशर्तींच्या अधीन राहून कार्यवाही करणे असे असेल.

४. दंडात्मक कार्यवाहीचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल :

**अ) व्यक्तीसाठी** : शिस्तभंगाची कार्यवाही करणे, सेवापुस्तिकेत नोंद करणे, वेतनवाढ रोखणे/ पदोन्नती रोखणे अथवा यापेक्षा अधिक कठोर कार्यवाहीसाठी कायदेशीर तरतुदींच्या अधीन राहून शिफारस करणे.

**ब) विभाग, आस्थापना अथवा संस्था यांसाठी** : शासकीय अनुदान बंद करणे, शासकीय सवलती स्थगित करणे अथवा बंद करणे, परवाना रद्द करणे, वर्जित प्रयोजनांची सबब पुढे करून राजभाषेचा वापर टाळला जात असेल तर त्या कारणांची छाननी करून संबंधिताविरुद्ध योग्य त्या कठोर शिफारशी करणे.

**क)** उपरोक्त दंडात्मक कार्यवाही विरुद्ध दाद मागण्याचा आस्थापना, संस्था, विभाग अथवा व्यक्ती यांना अधिकार असेल. त्यासाठी शासन सक्षम समितीची/अधिकाऱ्याची नेमणूक करील.

५. मराठी भाषेचा वापर सर्व स्तरावर वाढविण्यासाठी दंडसंहितेची अंमलबजावणी अत्यंत काटेकोरपणे होणे आवश्यक आहे, असे समितीचे ठाम मत झालेले आहे. समितीस असेही वाटते की, जे कर्मचारी व अधिकारी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करतात त्यांना प्रशस्तिपत्र देणे, त्यांचा गौरव करणे, अधिकच्या वेतनवाढी देणे आणि पदोन्नतीच्या वेळी त्यांचा अग्रक्रमाने विचार करणे आवश्यक आहे.

६. जबाबदार अधिकाऱ्यास दंडात्मक कार्यवाही करताना, कोणतीही शंका आल्यास, तो भाषा सल्लागार समितीचे मार्गदर्शन घेऊ शकेल.

७. सदर कार्यालय सक्षमपणे चालावे यासाठी अंदाजपत्रकात विशेष आर्थिक तरतूद करण्यात यावी.

■

म

□

भाग सहा

# । फेर आढावा ।

**। फेर आढावा ।**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तयार करण्यात आलेल्या या कृती आराखड्याचे किमान दर तीन वर्षांनी पुनर्विलोकन व्हावे. सूचित कालावधीप्रमाणे शिफारशीची अंमलबजावणी किती झाली आहे व कोणकोणती कामे व्हावयाची आहेत, या दोन्हींचा विचार पुनर्विलोकनात केला जावा. तसेच कालपरत्वे निर्माण होणारे प्रश्न लक्षात घेऊन मराठी भाषेसंबंधीच्या भाषिक धोरणात आवश्यक ते बदल करण्यात यावेत. तथापि, या भाषिक धोरणाच्या मूळ गाभ्याला / रचनेला बाधा उत्पन्न होईल, असे कोणतेही बदल करता येणार नाहीत.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी व विकासासाठी महाराष्ट्र शासन कायम बांधील राहील.

■

म

□

भाग सात

# । उपसंहार ।

। उपसंहार ।

अनुक्रमांक १ ते ६ या प्रकरणात नमूद केलेल्या सर्व बाबी, शिफारशी व तपशील यांसह हे धोरण शासनाने स्वीकारले व त्याची अंमलबजावणी केल्यास, मराठी भाषक समाजाला महाराष्ट्रात, भारतात आणि जागतिक पातळीवर अनेक लाभ होतील.

आपले सर्व शासकीय कामकाज मराठी भाषेत असल्याने राज्यातील जनतेचा शासकीय योजनांमधील सहभाग वाढेल. वाढत्या जनसहभागामुळे विविध शासकीय योजनांमधील आर्थिक, मानवी व अन्य गुंतवणूक अधिक फलदायी ठरेल.

उच्च शिक्षणातील अनेक अभ्यासक्रम सध्या मराठी भाषेत नसल्याने मराठीभाषक असंख्य विद्यार्थ्यांना ते अन्य भाषेतून शिकविल्या जात असलेल्या अभ्यासक्रमामुळे आकलन व अभिव्यक्तीची अडचण होते. सर्वच अभ्यासक्रमांना मराठी माध्यमाचा पर्याय दिल्यामुळे आकलन, अभिव्यक्ती वाढून उच्च शिक्षणाचा दर्जा, गुणवत्ता व व्याप्ती तसेच उपयुक्तता वाढेल.

महाराष्ट्र राज्यातील विविध शासकीय कामकाज पूर्णपणे मराठी भाषेत झाले आणि खाजगी कामकाजात मराठी भाषेच्या वापरासाठी सूचना व प्रोत्साहन दिले गेले तर, मराठी भाषेची जाण असलेल्या व मराठी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या असंख्य उमेदवारांना रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध होतील.

मराठी भाषा ही स्वतंत्र भाषा असून तिला व्यापक व गौरवशाली परंपरा आहे. या परंपरेस साजेसे स्थान मराठी भाषेला जगाच्या पटलावर मिळू शकेल.

लहान शब्द, कमी लांबीचे वाक्य, भाषेची लवचिकता, सामासिक शब्दांची विपुलता, उच्चारानुसार व संदर्भाने स्पष्ट होणारे एकाच शब्दाचे विविध अर्थ, तसेच अर्थच्छटा या वैशिष्ट्यांमुळे जगातील अनेक भाषांपेक्षा मराठी भाषा कमी वेळात अधिक भाषिक कार्य करण्यास उपयुक्त आहे. या

उपयुक्ततेमुळे मराठी भाषेचा जगभर वापर होऊ शकतो, हे लक्षात घेऊन त्या अनुषंगाने नवीन रोजगारनिर्मिती होऊ शकेल.

जगात आज मराठी भाषा दहाव्या क्रमांकावर असून या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीनंतर मराठी भाषा जगातील अधिक प्रभावी व अधिक व्यापक भाषा बनेल. जगातील प्रथम प्राधान्याची भाषा बनण्याची क्षमताही मराठी भाषेत असून त्या स्पर्धेसाठी पुढील काळात मराठी भाषा सक्षम ठरेल.

■

म

□

भाग आठ

# । परिशिष्ट ।

। परिशिष्ट ।

१. भाषा सल्लागार समितीच्या दि. १ फेब्रुवारी २०१३, दि. २० व २१ जून २०१३, दि. २० व २१ नोव्हेंबर २०१३ व दि. २८ मे २०१४ या चार बैठकांमध्ये मराठी भाषेच्या धोरणाविषयी चर्चा करण्यात आली आणि दि. २१ व २२ जुलै २०१४ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षांसाठीचे 'मराठी भाषाविषयक धोरण - २०१४ (मसुदा)' यास उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मान्यता दिली. तसेच मसुदा समितीने आणखी एक बैठक आयोजित करावी आणि २१ व २२ जुलै २०१४ रोजी सदस्यांकडून आलेल्या सर्व उपसूचनांचा समावेश करून तो शासनास पाठविण्यात यावा असे ठरले.

२. भाषा सल्लागार समितीने मसुदा समितीची स्थापना केली व त्यास शासनाने मान्यता दिली. या मसुदा समितीच्या दि. १७ व १८ फेब्रुवारी २०१४, दि. ५ व ६ मार्च २०१४, दि. १३ व १४ मार्च २०१४, दि. ३ व ४ एप्रिल २०१४, दि. २६ व २७ मे २०१४, दि. ९ व १० जून २०१४, दि. २४, २५ व २६ जून २०१४ व ४ जुलै २०१४ तसेच दि. १ व २ ऑगस्ट २०१४ अशा एकूण नऊ बैठका झाल्या.

३. 'महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ व त्याखालील नियम आणि आदेश' (दोन खंड) यांचे अवलोकन समितीने केलेले आहे. तसेच अनेक शासन आदेश, परिपत्रके इत्यादींचे अवलोकन समितीने केलेले आहे.

४. 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५' व 'महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०' यांचे अवलोकन मसुदा समितीने केलेले आहे.


५. भारत सरकारने हिंदी भाषेच्या वापरासंबंधी जी जी परिपत्रके काढलेली आहेत, त्यांचेही अवलोकन मसुदा समितीने केलेले आहे.

६. सर्वोच्च न्यायालयाने 'कर्नाटक सरकार विरुद्ध नुल्लर प्रसाद आणि इतर' यांच्या प्रकरणात २०१३ साली दिलेले निकालपत्र (सिव्हिल अपील नं. ५१६६-५१९० ऑफ २०१३) याचेही अवलोकन मसुदा समितीने केलेले आहे.

७. ठाणे येथील मराठी अभ्यास केंद्राने तयार केलेल्या पुस्तिकांचे / पुस्तकांचे अवलोकन मसुदा समितीने केलेले आहे.

८. आवश्यक असणाऱ्या इतर अनेक संदर्भग्रंथांचे आणि साधनसामग्रीचे अवलोकन मसुदा समितीने केलेले आहे.

■


जालबोलण
पुर्सासि संज्ञारवुण तेहीतुजलागीसांगेन हेतपुरविन
येकसंशयमजप्रति तेनिवृतिकरावि ७० कवणाचेघडंद
रण्यासांगावे ७१ तवंम्हणेचक्रपाणि ऐकरायातेसद्गुणि
१ निरोपक्षंउनि रंगीतं निर्वैरसमदर्शन: २ टिका जोकोणि
त्यामजवांचुनि आननाहि ७२ सदाजोशांतरुप नो
पमाणसमान निर्वै
म